# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) ५१७ (१८-०३-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक ४७४१० ला दिनांक २७ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत प्राध्यापकांची १६९ पदे रिक्त असल्याचे दिनांक २५ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२९-१०-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत प्राध्यापकांची (शिक्षकीय व शिक्षक समकक्ष) एकूण १६१ पदे रिक्त होती.

(२) शासन निर्णय दिनांक ०७/०८/२०१९ अन्वये सर्व अकृषी विद्यापीठातील मंजूरी पदांच्या ८० टक्के इतक्या मर्यादेत शिक्षकीय पदे भरण्याची मंजूरी देण्यात आलेली आहे. दरम्यानच्या काळात वित्त विभागाने त्यांच्या दिनांक ०४/०५/२०२० च्या शासन निर्णयान्वये कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील वित्तीय स्थितीसंदर्भात उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने पदभरतीवर निर्बंध आणले आहेत. तथापि, अकृषी विद्यापीठांमधील रिक्त पदे भरण्याबाबत वित्त विभागाने पदभरतीवर आणलेल्या निर्बंधातून सूट मिळण्याबाबत वित्त विभागाशी विचारविनियम सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धनगर समाज बांधवांच्या विकासासाठी कार्यान्वित केलेल्या विविध योजना प्रलंबित असल्याबाबत

**(२) ४००६ (१४-०९-२०२०) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक ७ ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयान्वये बहुजन कल्याण मंत्रालयाने आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीसाठी सुरू असलेल्या योजनांच्या धर्तीवर धनगर समाज बांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याच्या हेतूने विविध योजना कार्यान्वित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या योजनांसाठी आतापर्यंत किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२९-१०-२०२१) :** (१) होय.

(२) सदरहू योजनांसाठी सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षात रुपये ५००.०० कोटी इतकी तरतुद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली होती. सन २०२०-२०२१ या चालू वित्तीय वर्षात रुपये ५१५०.०४ लक्ष इतकी तरतुद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाने येस बँकेत ठेवी ठेवल्याबाबत

**(३) ४१५४ (१५-०७-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्बंध घातलेल्या आणि बुडीत गेलेल्या येस बँकेत सन २०१९ मध्ये सुमारे १४० कोटींच्या ठेवी ठेवल्या असल्याचे दिनांक २७ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार खाजगी बँकेत विद्यार्थ्यांच्या पैशांची गुंतवणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच, येस बँकेत गुंतवणूक करण्यात आलेल्या ठेवींच्या सुरक्षिततेसंदर्भात कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२७-१०-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

वित्त विभागाच्या दिनांक २७/१०/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य सार्वजनिक उपक्रमांच्या अतिरिक्त निधीची गुतंवणुकी संदर्भातील मार्गदर्शक सुचनांनुसार मुंबई विद्यापीठाच्या वित्त व लेखा समितीच्या दिनांक २३/०८/२०१८ रोजीच्या बैठकीत ज्या बँकेची किमान ४००० कोटी नक्त मत्ता (Net Worth) आहे. अशा बँकेत गुतंवणुक करण्याच्या प्रस्ताव मान्य करण्यात आल्यानुसार सदर प्रस्तावास विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १८/०९/२०१८ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली त्यास अनुसरुन मुंबई विद्यापीठाने माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये सुमारे रुपये १४० कोटी गुतंवणूक करण्यात आली.

तसेच सदर ठेवीच्या सुरक्षितेसंदर्भात विद्यापीठाने येस बँकेशी वेळोवेळी ई-मेलद्वारे पत्रव्यवहार करण्यात आला त्यावर येस बँकेने दिनांक २०/०७/२०२० च्या ई-मेलद्वारे येस बँक मधील असलेल्या ठेवी पूर्णपणे सुरक्षित असल्याचे कळविले आहे.

(२) सदर ठेवीच्या सुरक्षितेसंदर्भात विद्यापीठाने येस बँकेशी वेळोवेळी ई-मेलद्वारे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. येस बँकेने दिनांक २०/०७/२०२० च्या ई-मेलद्वारे येस बँक मधील असलेल्या ठेवी पूर्णपणे सुरक्षित असल्याचे कळविले आहे. तसेच या प्रकरणी मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे तत्कालीन उपकुलसचिव, वित्त व लेखा विभाग यांना निलंबित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाच्या परीक्षांचे मूल्यांकन करणाऱ्या प्राध्यापकांचे मानधन अदा करण्याबाबत

**(४) ४६०२ (०८-०९-२०२०) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या परीक्षांचे मूल्यांकन करणाऱ्या प्राध्यापकांचे लाखो रुपयांचे मानधन प्रलंबित असल्याचे दिनांक २७ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विद्यापीठातील काही प्राध्यापकांना एका उत्तरपत्रिकेसाठी अवघा एक रुपया एवढेच मानधन त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मुंबई विद्यापीठाच्या परीक्षांचे मूल्यांकन करणाऱ्या प्राध्यापकांचे थकीत असलेले लाखो रुपयांचे मानधन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२७-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील सेवानिवृत्त व कार्यरत कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वेतनाबाबत

**(५) ४६२७ (०८-०९-२०२०) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१०/(४८८/१०)/विशि-१ दिनांक १५/०२/२०११ लागु करण्यात आला असून सदर योजनेचा लाभ सर्व कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/१०/२००६ पासून देण्यात आलेला आहे, परंतु सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण २०१६/(२६२/१६)/वशि-१ दिनांक ०७ डिसेंबर, २०१८ अन्वये वित्त विभागाची मान्यता नाही या तांत्रिक कारणास्त्व रद्द करण्यात आल्यामुळे ज्या सेवानिवृत्त व कार्यरत कर्मचाऱ्यांनी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ घेतलेला आहे त्यांची सातवा वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चिती दिनांक ०७/१२/२०१८ च्या शासन निर्णयानुसार करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय सहसंचालक कार्यालयामध्ये शासन निर्णय, क्र.२०१०/४८८/१०)/विशि-१ दिनांक १५/०२/२०११ नुसार मान्य केलेले लाभ न देताच वेतननिश्चिती करण्याची कार्यवाही करत आल्यामुळे सेवानिवृत्त व कार्यरत कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिनांक ०७/१२/२०१८ च्या शासन निर्णयानुसार शिक्षण संचालक यांना निर्देशित करुन सेवानिवृत्त महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे प्रस्ताव सातव्या वेतन आयोगाची वेतन निश्चिती करुन ८० टक्के निवृत्तीवेतन मंजूर करण्याबाबतचे परिपत्रक काढण्याचे आदेश निर्गमित करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२९-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) ज्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नियमित सेवानिवृत्तीवेतन मिळण्यास अडचणी येत असल्यास अशा प्रकरणी तात्पुरते सेवानिवृत्तीवेतन सुरू करण्याबाबत शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांनी दिनांक १२/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ग्लोबल इम्पॅक्ट हब, बाळकुम, ठाणे येथील कोविड रुग्णालयाविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(६) ४६५५ (२२-०७-२०२०) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्लोबल इम्पॅक्ट हब, बाळकुम, ठाणे येथे उभारण्यात आलेल्या कोविड रुग्णालयात दाखल असलेले कळव्यातील ७२ वर्षीय एक वयोवृध्द रुग्ण बेपत्ता असून याच रुग्णालयातील अन्य एका रुग्णाचा मृत्यू झाल्याचे सांगून त्याच्यावर दिनांक ३ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास अंत्यसंस्कार झाल्याचे सांगण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात तो जिवंत असल्याचे वास्तव समोर आल्यामुळे रुग्णालय प्रशासनाच्या बेजबाबदार कारभाराबद्दल विनाविलंब चौकशी करून संबंधित दोषी विरोधात कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी व ठाणे मतदार जागरण अभियान यांनी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा आदींकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मृतदेहाची बॅग पारदर्शक नसल्याने चेहराही पाहण्याची सोय नसल्याने नातेवाईकांच्या भावनांशी खेळ केला जात असल्याने याबाबत तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२७-१०-२०२१)** : (१) व (२) ठाणे महानगरपालिकेच्या अधिनस्त ग्लोबल इम्पॅक्ट हब, बाळकुम, ठाणे येथील कोविड रुग्णालयात उपचारासाठी दाखल रुग्ण श्री.भालचंद्र गायकवाड जिवंत असताना त्यांच्या नावे मृत्यूचा दाखला दिल्या गेल्याची वस्तुस्थिती आहे.

तसेच, अशा प्रकारची तक्रार लोकप्रतिनिधींनी केल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) कोविड रोगामुळे मृत्यूनंतर रुग्णाच्या मृतदेहाकरीता पारदर्शक बॅग वापरण्यात आली नव्हती. तथापि, रुग्णाच्या नातेवाईकांना मृतदेह दाखविण्यात आले असल्याची वस्तुस्थिती ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) सदर प्रकरणी ठाणे महानगरपालिकेने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे:-

- सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी माहे जुलै, २०२० मध्ये चौकशी समिती नियुक्त केली आहे.
- सदर चौकशी समितीच्या अहवालानुसार उपरोक्त घटनेच्या दोषी विरुध्द तात्काळ कारवाई केली असून तत्कालीन वैद्यकिय अधीक्षक यांची बदली व संबंधित परिचारीकांना बडतर्फ करण्यात आले आहे.
- कोविड रुग्णालयाच्या कामकाजात सुधारणा आणण्याच्या दृष्टिने उक्त चौकशी समितीने दिलेल्या विविध शिफारशींची अंमलबजावणी ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असल्याची बाब महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षक/कर्मचारी नियुक्ती, मान्यता व शालार्थ आयडी प्रकरणातील भ्रष्टाचाराची चौकशी करण्याबाबत

**(७) ५३०१ (२५-११-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षक/कर्मचारी नियुक्ती, मान्यता व शालार्थ आयडी प्रकरणातील भ्रष्टाचाराची चौकशी एसआयटीमार्फत करण्याबाबत नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक १६ ऑगस्ट, २०२० व दिनांक २८ ऑगस्ट, २०२० रोजी निवेदन पाठवून विनंती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२८-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) शालार्थ क्रमांक देताना झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी दिनांक १४/०८/२०२० च्या शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या चौकशी समितीची पुर्नरचना शासन निर्णय दिनांक १/०४/२०२१ अन्वये करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात “सर्वांसाठी घरे” अभियानांतर्गत सुरु करण्यात आलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेबाबत

**(८) ५३७९ (२०-११-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ३९५ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) केंद्र शासनाने नागरी भागाकरीता सन २०२२ पर्यंत “सर्वांसाठी घरे” या अभियानांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना सुरु केली असून शासनाच्या दिनांक ०९ डिसेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार केंद्र शासनाच्या सदर योजनेचा शासनाने अंगिकार केला असून या योजनेत सन २०२२ पर्यंत

राज्यात १९ लाख ४० हजार घर निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे व त्यानुसार केंद्र शासनाने राज्यातील ३९१ शहरामध्ये योजना राबविण्यास मंजूरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत माहे जानेवारी, २०२० पर्यंत प्रत्यक्षात केवळ १,९१,९९८ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून केवळ २,०१,६११ घरकुलांचे काम प्रगतीपथावर असल्यामुळे उर्वरित कामे सन २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असतानाही त्यानुसार प्रयत्न होत नसल्याचे दिसत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर योजनेंतर्गत बांधावयाच्या घरांचे उद्दिष्ट विहित मुदतीत पूर्ण होण्याकरीता कोणते विशेष प्रयत्न करण्यात आले वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२९-०७-२०२१) :** (१) होय.

(२) व (३) केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने राज्यातील ११६१ प्रकल्पांतील ११,१३,७२३ घरकुलांना व घटक क्र.२ मधील CLSS अंतर्गत ३,९४,८८१ घरकुलांना अशा एकूण १५,०८,६०४ घरकुलांना मंजूरी दिली आहे. त्यापैकी बांधकाम पूर्ण झालेल्या व प्रगतीपथावर असलेल्या घरकुलांची संख्या CLSS वगळता २,६८,४०८ इतकी आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने विविध उपाय योजना केल्या असून, मोजणी शुल्कात ५०% सवलत देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शासकीय जमीन रुपये १/- प्रती चौ.मी. या नाममात्र दराने वितरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व अल्प उत्पन्न घटक गटातील लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या सदनिकेच्या पहिल्या दस्ताला रुपये १०००/- इतका मुद्रांक शुल्काचा सवलतीचा दर निश्चित करण्यात आला आहे. तसेच राज्यात प्रधानमंत्री आवास योजनेस गती देण्याच्या अनुषंगाने सार्वजनिक-खाजगी धोरणाची (PPP) राज्यात अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत केंद्र हिश्याचा निधी उपलब्ध करुन

देण्याबाबत केंद्र शासनास दिनांक ०२/११/२०२० च्या अर्धशासकीय पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत मंजूर घरकुल बांधकाम प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याबाबत संबंधित अंमलबजावणी यंत्रणांकडे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण या सुकाणू अभिकरणामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तळोजा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (ता.पनवेल, जि.रायगड) येथील ग्लोबल मरिन एक्सपोर्ट कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(९) ५६६३ (१८-११-२०२०) श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील प्लॉट नंबर जी २ येथे ग्लोबल मरिन एक्सपोर्ट कंपनीतून सुक्या व ओल्या खाऱ्या माश्यांपासून फिश ऑईल व फिश पावडर अशी उत्पादने तयार करण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुक्या व ओल्या माश्यांवर प्रक्रिया केल्यामुळे कंपनी सभोवतालच्या परिसरात दुर्गंधी वास पसरत असल्याने तेथील स्थानिक रहिवाशांच्या आरोग्यावर परिणाम झाल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनी प्रशासनाकडून सभोवतालच्या परिसरात दुर्गंध वास पसरू नये यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली, तसेच, सुक्या व ओल्या माश्यांवर प्रक्रिया करुन निर्मिती करण्यात येणाऱ्या उत्पादनासाठी महाराष्ट्र प्रदूषण महामंडळाकडून परवानगी घेण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०१-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदर कंपनी प्रशासनाकडून सभोवतालच्या परिसरात दुर्गंध पसरू नये याकरीता दुर्गंधीनाशक फवारणी व्यवस्था बसवली आहे. सदर उद्योगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र घेतले असून त्याची वैधता ३१/०१/२०२५ पर्यंत आहे.
(४) सदर उद्योगास दुर्गंधी निर्माण केल्याबद्दल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १५/१०/२०२० रोजी उत्पादन बंदचे आदेश दिले असून सद्य:स्थितीत उद्योग बंद आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील क्लस्टर योजनेत गावठाण, कोळीवाडे समाविष्ट करण्याबाबत

**(१०) ६१८३ (१४-१२-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील क्लस्टर योजनेत गावठाण, कोळीवाडे समाविष्ट करण्यासंदर्भातील राज्य शासनाच्या निर्णयाविरोधात दाद मागून उक्त निर्णयाबाबत शासन निर्णय निर्गमित करणे तसेच मुंबईतील १३ कोळीवाड्यांचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रसिध्द केलेले विस्तारित सिमांकनाचे चुकीचे नकाशे इत्यादी प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या राज्यात पसरलेल्या कोविड-१९ ह्या साथीच्या काळात क्लस्टर योजनेच्या सुनावण्यांना रद्द करण्याबाबतही मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-१०-२०२१)** : (१) यासंदर्भातील मा.स्थानिक लोकप्रतिनिधी (कोकण पदवीधर) यांनी मा.राज्यपाल, महोदय यांना अग्रेषित केलेले दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजीचे निवेदन या विभागास प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) ठाणे महानगरपालिकेने नागरीकांच्या सुचना/ हरकतीसाठी प्रसिध्द केलेल्या ४४ नागरी पुनरुत्थान आराखड्यांवर सुमारे १७७७० सुचना/ हरकती प्राप्त झाल्या होत्या. महानगरपालिकेने प्रथम टप्प्यात ०६ नागरी पुनरुत्थान आराखड्यामधील प्राप्त ३४१३ सुचना/ हरकतदारांना सुनावणी देण्यात येऊन महानगरपालिकेने त्यांचेकडील ठराव क्र.५८४ दिनांक २०/१२/२०१९ अन्वये गावठाण/ कोळीवाडे वगळून शासनास सादर करणेस मंजूरी दिलेली आहे. तसेच उर्वरित आराखड्यामधील शिल्लक १४३५७ पैकी सुमारे ११००२ सुचना/हरकती या गावठाणे/ कोळीवाडे वगळणेबाबत असल्याने व सदर गावठाण/ कोळीवाडे वगळणेबाबत आराखड्यामध्ये सर्वसमावेशक एकसुत्रता राहण्याच्या दृष्टीने, तसेच सद्य:स्थितीमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव विचारात घेता गावठाण/कोळीवाडे/दाट वस्तीचे क्षेत्र वगळण्याबाबत सुचना-हरकतदारांना सुनावणीचे प्रयोजन नसल्यामुळे सदरच्या सुचना/ हरकती सुनावणीमधून वगळण्यात येऊन उर्वरित ३३५५ सूचना/ हरकतदारांना सुनावणी देणेकामीची कार्यवाही प्रस्तावित करण्याचा सर्वसमावेशक निर्णय ठाणे महानगरपालिकेने घेतला आहे.

तसेच महसूल खात्याच्या अभिलेखाप्रमाणे तयार करण्यात आलेल्या व नगरविकास विभागाकडून मुंबई महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या मुंबई उपनगर जिल्ह्यातील १३ कोळीवाड्यांचे सिमांकन बृहन्मुंबई विकास आराखडा-२०३४ वर प्रतिबिंबित करुन सदर सिमांकनावर जनतेकडून सूचना/ हरकती मागविण्यात आल्या होत्या. सदर कोळीवाड्यांच्या सिमांकनाबाबत मुंबई महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या सूचना/ हरकतीचे दस्तऐवजीकरण करुन प्राप्त झालेल्या एकूण १२९४ सूचना/ हरकती महसूल विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उद्योग विभागाच्या महाजॉब्स पोर्टलवर नोंदणी करुनही रोजगार न मिळाल्याबाबत

**(११) ६२६२ (२३-११-२०२०) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दोन महिन्यापूर्वी सुरू केलेल्या उद्योग विभागाच्या महाजॉब्स पोर्टलवर नोकरीसाठी लाखो तरुण-तरुणींनी नोंदणी केली पण त्यातील केवळ पाचशे लाभार्थ्यांना प्रत्यक्ष रोजगार मिळाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाळेबंदी शिथिल केल्यानंतर हजारो उद्योग सुरू होत असतानाही राज्यातील बेरोजगारांना या उद्योगात स्थान मिळत नसल्याने बेरोजगारांची नोकरी अभावी उपासमार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उद्योग विभागामार्फत सुरू केलेल्या महाजॉब्स पोर्टलवर नोकरीसाठी नोंदणी केलेल्या बेरोजगारांना तात्काळ रोजगार उपलब्ध होण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२८-१०-२०२१) :** (१) २,८२७ हुन अधिक उद्योग घटकांनी व ३,०३,४७८ रोजगार इच्छुकांनी पोर्टलवर नोंदणी केलेली असून, उर्वरित बाब खरी नाही.

(२) हे खरे नाही.

(३) लॉकडाऊन नंतर बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा या हेतूने महाजॉब्स पोर्टलची निर्मिती करण्यात आलेली आहे. अकुशल तरुण-तरुणींना त्यांचे प्रोफाईल व्यवस्थित भरल्यावर त्यांना योग्य त्या क्षेत्रात नोकरी मिळवून देण्यासाठी तांत्रिक प्रशिक्षण देण्याबाबत कौशल्य विकास व उद्योजकता विभागास कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अंमली पदार्थ तस्करी रोखण्याच्या गुन्ह्यांचा तपास एटीएस विभागाकडे सोपविण्यात आल्याबाबत

**(१२) ६४८५ (१६-०३-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाच्या (एटीएस) विभागाकडे अंमली पदार्थ तस्करी रोखणे आणि त्यासंबंधीच्या गुन्ह्यांचा तपास करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंमली पदार्थ तस्करी रोखणे आणि त्यासंबंधीच्या गुन्ह्यांचा तपास करण्याकरीता अंमली पदार्थ विरोधी पथके असतानाही सदरहू जबाबदारी एटीएस विभागाकडे दिल्याने एटीएस विभागात नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२६-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

अंमली पदार्थ विरोधी गुन्ह्यांचा तपास संबंधित जिल्ह्यांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाकडून व स्थानिक पोलीस ठाण्याकडून करण्यात येतो. तसेच दहशतवाद विरोधी पथकासही अंमली पदार्थ विरोधी गुन्हे दाखल करण्याचे व त्यांचा तपास करण्याचे अधिकार आहेत आणि पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडूनही आवश्यकतेनुसार वेळोवेळी वर्ग करण्यात आलेल्या अंमली पदार्थ विरोधी गुन्ह्यांचा तपास दहशतवाद विरोधी पथकाकडून करण्यात येत असतो.

अंमली पदार्थ विरोधी गुन्ह्यांसदर्भात अपर पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना समन्वय अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहत आराखड्यातील महाविद्यालये नॅकच्या श्रेणीत आणण्याबाबत

**(१३) ६७७७ (१५-०३-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विद्यापीठाने बृहत आराखड्यात सन २०१४ पर्यंत ४१७ महाविद्यालये नॅकच्या श्रेणीत आणण्याचे ध्येय निश्चित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नॅकच्या रुपरेषा संदर्भात शासनाचे धोरण काय आहे, तसेच, विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयांपैकी अनेक ठिकाणी पायाभूत सुविधांचा अभाव असून काही ठिकाणी शिक्षकांची कमतरता असून कोरोना परिस्थितीमध्ये अनेक महाविद्यालये विस्कळीत झाल्यामुळे बहुतांश महाविद्यालयांनी नॅकचे मूल्यांकन करण्यासाठी प्रक्रिया सुरु केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२७-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

विद्यापीठाने सन २०१९-२०२० ते २०२३-२०२४ पर्यंतच्या ५ वर्षाच्या कालावधीकरीता तयार केलेल्या बृहत आराखड्यात सन २०२४ पर्यंत ४१७ महाविद्यालयांना नॅकच्या श्रेणीत आणण्याचे ध्येय निश्चित केले आहे.

(२) राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित सर्व पात्र महाविद्यालयांना मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करणे अनिवार्य करण्यात आले असून ज्या शैक्षणिक संस्थांनी/ महाविद्यालयांनी अद्यापपर्यंत मूल्यांकन वा पुनर्मूल्यांकन करुन घेतलेले नाही त्यांनी निश्चित केलेल्या तीन टप्प्यांचा अवलंब करुन आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिनांक ८ ऑक्टोबर, २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित ज्या महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन केले नाहीत अशा जास्तीत जास्त महाविद्यालये ही कायम विना अनुदान तत्त्वावरील असून या महाविद्यालयांमध्ये आवश्यक त्या प्रमाणात शिक्षक, स्वतःची इमारत व इतर आवश्यक सोईसुविधांची कमतरता असल्याने ही महाविद्यालये नॅक मूल्यांकन करण्याकरीता पुढाकार घेत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. गेल्या वर्षभरापासून कोरोना प्रादुर्भावामुळे स्थिती विस्कळीत झाल्याने तसेच मागील काही कालावधीपासून आरक्षण निर्धारणास स्थगिती असल्यामुळे शिक्षक नियुक्तीची प्रक्रिया स्थगित असल्याने बहुतांश महाविद्यालयांनी नॅकचे मूल्यांकन करण्यासाठी प्रक्रिया सुरु केली नाही, हे खरे आहे.

(३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाशी संलग्नित ज्या महाविद्यालयांच्या स्थापनेला ५ वर्ष पूर्ण झालेले आहेत, परंतु अशा महाविद्यालयांनी अजूनपर्यंत नॅक मूल्यांकन करण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नाही अशा महाविद्यालयांना वेळोवेळी नॅक मूल्यांकन करण्यासंदर्भात परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात आले आहे. तसेच, नॅक मूल्यांकनाकरीता पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्याचे उद्देशाने कार्यशाळेचे देखील विद्यापीठाद्वारे आयोजन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळांचे नॉनप्लॅनमध्ये वर्गीकरण करण्याबाबत

**(१४) ६८२४ (१५-०३-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी पंचवार्षिक योजनेतील राज्यातील १५ जिल्ह्यातील ७६ शाळा व २३५ तुकड्यांना (टीएसपी प्लॅन) मध्ये अनियमित लेखाशीर्ष २२०२१९०१ अंतर्गत वेतन अनुदान मंजूर झाले असून सदर योजना पूर्ण झाल्यानंतर (टीएसटी प्लॅन) अनियमित लेखाशीर्ष हा शालेय शिक्षण विभागाच्या (नॉनप्लॅन) नियमित लेखाशिर्षामध्ये समाविष्ट होणे अपेक्षित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळेमध्ये कार्यरत १३०० शिक्षकांचे वेतन गत १३ वर्षांपासून टीएसपी प्लस २२०२१९०१ या लेखाशिर्षामधून काढण्यात येत असून सदर लेखाशिर्षातंर्गत वेतन घेणाऱ्या शाळा व तुकड्यांचे नॉनप्लॅन मध्ये समाविष्ट न झाल्यामुळे निधीअभावी आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळेमधील शिक्षकांचे वेतन वेळेवर होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचवार्षिक योजनेनुसार प्लॅन मधून नॉन प्लॅनमध्ये वर्गीकरण ७ ते ८ वर्षांपूर्वी होणे अपेक्षित असूनही अद्यापपर्यंत लेखाशीर्ष वर्गीकरण करण्यात आले नसल्यामुळे सदर वर्गीकरण प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कारवाई करुन लेखाशीर्ष वर्गीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१४-१०-२०२१)** : (१) सदर योजनेवरील खर्च अनिवार्य खर्चांतर्गत समाविष्ट करण्याबाबत शालेय शिक्षण विभागामार्फत प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

(२) व (३) आदिवासी उपयोजनेंतर्गत कार्यक्रम खर्चासाठी नियोजन विभागामार्फत आदिवासी विकास विभागाच्या मागणीपेक्षा कमी प्रमाणात वार्षिक नियतव्यय प्राप्त झाल्याने विषयांकित योजनेस मागणीप्रमाणे तरतूद करण्यास मर्यादा येतात. तथापि, पुरवणी मागणीद्वारे वाढीव नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येत असून शिक्षकांना वेतनापासून वंचित ठेवण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी येथील नगरपरिषदेच्या मालकीच्या जागेची झालेली विक्री रद्द करण्याबाबत

**(१५) ६८५७ (१७-०३-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील सर्व्हे नं. ३६६ मधील नगरपरिषदेच्या मालकीच्या जागेची मुदत संपलेली असतानाही सदर मालमत्ता ताब्यात न घेता त्याची विक्री होत असल्यामुळे त्याबाबतचे सर्व व्यवहार रद्द करण्यात यावेत अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेचे हस्तांतरण करण्यास शासनाचे मंजुरी आदेश नसताना तसेच इतरही नियमभंग होत असल्यामुळे उक्त मालमत्तेची झालेली विक्री रद्द करण्याबाबत व जागा नगरपालिकेच्या ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) तत्कालीन परिस्थितीमध्ये नगरपरिषदेच्या मालकीच्या जागेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या आदेशानुसार नगरपरिषदेस होते त्यानुसार तत्कालीन नगर परिषद, परभणी यांनी सदर जागा शासनाच्या मान्यतेने पीपल्स को-ऑप बँक यांना विक्री करण्याबाबत ठराव क्र.८१ दिनांक २२/०६/१९७३ व ठराव क्र.७० दिनांक १२/१०/१९७६ संमत केलेला आहे.

त्यानुसार संचालक, नगर परिषद संचालनालय, मुंबई यांनी सदर जागा लिलावाशिवाय पीपल्स को-ऑप बँक यांना विक्री करण्यास मान्यता दिली असल्याचे उप संचालक, नगर परिषद संचालनालय, मुंबई यांनी दिनांक १७/०१/१९७७ च्या पत्रान्वये परभणी नगरपरिषदेस कळविले आहे.

त्याप्रमाणे सदर जागेची खरेदी खतादवारे उक्त बँकेस विक्री करण्यात आली. नियमानुसार विहित कार्यवाही झाली असल्याने उक्त मालमत्तेची विक्री रद्द करुन जागा ताब्यात घेण्याबाबत कार्यवाहीची आवश्यकता दिसून येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पीक विमा योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी स्थापन केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीबाबत

**(१६) ७५०५ (१६-०३-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अ‍ॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पीक विमा योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी मा.मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्रिमंडळ उपसमितीने किती बैठका घेतल्या व पीक विमा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिफारशी केल्या आहेत काय, सदर शिफारशीमुळे किती शेतकऱ्यांना लाभ झाला आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२५-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

मंत्रिमंडळ उपसमितीच्या एकूण ९ बैठका झालेल्या आहेत.

राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२० मध्ये १०७७२०८२ शेतकरी अर्जदारांनी रक्कम रुपये ५३० कोटी विमा हप्ता भरुन ५७६९८०९ हे. क्षेत्र विमा संरक्षित केले होते. संबंधित विमा कंपन्यांकडून १५५५२९० शेतकऱ्यांना रक्कम रुपये ९८०.६७ कोटी इतकी नुकसान भरपाई

रक्कम निश्चित करण्यात आली असून यापैकी ११८२३६८ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रुपये ७७८.४३ कोटी जमा करण्यात आलेली आहे. उर्वरित रक्कम वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

तसेच पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत मृग बहार २०२० व आंबिया बहार २०२०-२०२१ मध्ये ४२१३६५ शेतकरी अर्जदारांनी रक्कम रुपये १८६.६८ कोटी विमा हप्ता भरुन ३०८५८१ हे. क्षेत्र विमा संरक्षित केले होते. अंतरिम अहवालानुसार संबंधित विमा कंपन्यांकडून ९६४०९ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रुपये २११.४६ कोटी देय ठरत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाढवण (जि.पालघर) बंदर उभारणीच्या कामास स्थगिती देण्याबाबत

**(१७) ७५६० (१६-०३-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १२ मधील प्रश्न क्रमांक ५७४३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाढवण (ता.डहाणू, जि.पालघर) येथे बंदर उभारण्याची घोषणा केंद्र शासनाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढवण बंदर होणार असल्यामुळे तेथील मच्छीमार, शेतकरी, डायमेकर तसेच माश्यांचा गोल्डन बेल्ड आणि जैवविविधतेची मोठ्या प्रमाणात हाणी होणार असल्यामुळे तेथील नागरिकांचा या बंदराला विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढवण बंदरविरोधी संघर्ष समिती व मच्छिमार संघटना यांच्या शिष्टमंडळाने मा.मुख्यमंत्री यांची भेट घेऊन हे बंदर रद्द करण्यात यावे अशी मागणी दिनांक ३ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन याबाबत निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (२१-१०-२०२१)** : (१) हे खरे आहे.
(२) व (३) या संदर्भात वाढवण बंदर विरोधी संघर्ष समिती व महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती यांची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.
(४) व (५) वाढवण बंदर हे मोठे बंदर म्हणून जेएनपीटी यांच्या मार्फत विकसीत करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. केंद्र शासनाने दिनांक १९/०२/२०२० च्या अधिसुचने अन्वये वाढवण बंदर हे मोठे बंदर म्हणून घोषित केले आहे. प्रस्तावित वाढवण बंदर हे मोठे बंदर (Major Port) म्हणून विकसित होणार असल्याने हा प्रकल्प केंद्र शासनाचे अखत्यारीत आहे. प्रकल्प आराखडा, डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण (DTEPA) यांचे निर्णय व अहवालांमधील निष्कर्षांचा अभ्यास करुन बंदर प्रकल्पाबाबत योग्य त्या सहमती अंती निर्णय केंद्र शासनाचे अखत्यारीत आहे.

---

## कबनूर (जि.कोल्हापूर) येथे नगरपरिषद स्थापन करणेबाबत

**(१८) ७७९१ (१७-०३-२०२१) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कबनूर (जि.कोल्हापूर) येथील लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार ३८१४६ इतकी असून कबनूर येथे नगरपरिषद स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १४ जुलै, २०११ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्यामार्फत विहित मार्गाने शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कबनूर येथे नगरपरिषद स्थापन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२६-१०-२०२१) :** (१) व (२) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३(२), (२क) व ३ नुसार कबनूर नगरपरिषद स्थापन करणेबाबत सविस्तर प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडून दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी प्राप्त झाला आहे. या प्रस्तावात काही त्रुटी असल्याने त्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडून माहिती मागविण्यात आली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यावर निकषांची पूर्तता होत असल्यास याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई वरळी, ना.म.जोशी मार्ग तसेच नायगाव येथील बीडीडी चाळ प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१९) ८४२६ (११-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ७०३५ ला दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वरळी येथील बीडीडी चाळ प्रकल्पाच्या कामास गत अडीच वर्षात प्रत्यक्षात सुरूवात झालेली नसून वरळीसह ना.म.जोशी मार्ग आणि नायगाव येथील बीडीडी चाळीच्या पुनर्विकासासाठी म्हाडाने अनुक्रमे, टाटा कन्स्ट्रक्शन कंपनी, शापुरजी पालनजी आणि एल ॲण्ड टी या बड्या कंत्राटदारांची नियुक्ती करुन आज ४ वर्षे होऊनही प्रकल्पाचे कामास सुरूवात झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या निविदेतील तरतूदीनुसार पुनर्वसनाच्या इमारतीच्या पायाचे काम झाल्यानंतरच कंत्राटाच्या एकूण रक्कमेच्या पाच टक्के देयक अदा करण्याचे स्पष्ट निदेश असतानाही टाटा कॉम्पोसाईट कन्स्ट्रक्शन कंपनीने आराखड्यासाठी सादर केलेले रुपये २७६ कोटींचे देयक अदा करण्यासाठी म्हाडा प्रशासनावर दबाव आणून निविदेतील अटींचा भंग केल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरळील येथे संक्रमण शिबिराच्या बांधकाम आराखड्यात विद्यमान महाविकास आघाडी सरकारने सुचविलेल्या नव्या बदलानुसार संक्रमण शिबिर रद्द करुन त्याठिकाणी पुनर्वसनाच्या ४० मजली इमारतीचे बांधकाम करण्याचे नियोजित असून तळघरात वाहनतळ उभारण्याऐवजी वाहनतळासाठी स्वतंत्र इमारत उभारली जाणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ना.म.जोशी मार्ग तसेच नायगाव येथील २७५ रहिवाशी संक्रमण शिबिरात स्थलांतरीत होण्याच्या प्रतिक्षेत असल्यामुळे बीडीडी चाळीच्या पुनर्वसनाचे कामात निर्माण झालेल्या सर्व अडीअडचणीचे विनाविलंब निराकरण करून पुनर्वसनाचे काम शीघ्रगतीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२८-१०-२०२१)** : (१) वरळी येथील २ इमारतींच्या २७५ Pile Foundation चे काम पूर्ण झाले आहे.

(२) हे खरे नाही.

सदरहू प्रकल्पाच्या निविदेमध्ये कंत्राटदारास इमारतीच्या पायाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर केलेल्या कामाचा मोबदला ५% देयक अदा करण्याची तरतूद आहे.

(३) नव्या बदलानुसार संक्रमण शिबिर रद्द करण्यात आले आहे आणि त्या जागी एक पुनर्वसन व एक विक्रीयोग्य इमारत बांधणे प्रस्तावित आहे.

वरळी येथील सुधारित आराखड्यात पुनर्वसनाच्या ४० मजली इमारती प्रस्तावित असून सदर इमारतीच्या पोडियम मध्ये वाहन तळाची व्यवस्था करण्यात आली आहे. पुनर्वसन इमारत क्र. १ ला विशेष नियोजन प्राधिकरण/म्हाडा यांच्याकडून आय.ओ.ए. (IOA) प्राप्त झाली आहे. इतर परवानग्या प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे.

(४) व (५) बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचे काम शीघ्र गतीने पूर्ण होण्यासाठी चालू वर्षी शासन स्तरावरून पुढील कार्यवाही केली आहे :-

(I) बीडीडी चाळींच्या पुनर्विकासासाठी लाभार्थींची पात्रता निश्चित करण्यासाठी दिनांक ०९/०३/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सुचना जारी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार भाडेदारी हस्तांतरण (विक्री) केलेली दिनांक ०१/०१/२०२१ पर्यंतची प्रकरणे ग्राह्य धरण्यात येणार आहेत.

(II) लाभार्थींसोबत पुनर्वसन गाळ्याचा करारनामा करण्यास म्हाडास दिनांक २९/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकृत करण्यात आले आहे.

(III) बीडीडी चाळींतील भाडेकरूंना संक्रमण गाळे उपलब्ध नसल्यास प्रती महिना भाडे देण्याबाबत म्हाडास दिनांक १३/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

(IV) बीडीडी चाळीमधील गाळे सन १९९६ रोजी अस्तित्वात असल्याचा पुरावा आता गाळेधारकांनी देण्याऐवजी संचालक, बीडीडी यांनी प्रमाणित करण्याच्या सूचना दिनांक १०/०८/२०२१ रोजी देण्यात आल्या आहेत.

(V) सदरहू चाळींतील लाभार्थी व म्हाडा यांच्यामध्ये होणाऱ्या पुनर्वसन गाळ्यांच्या करारनाम्याकरीता नाममात्र रुपये १०००/- मुद्रांक शुल्क आकारण्याचा निर्णय मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक १८/०८/२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे.

---

## मुंबई महापालिकेतील सफाई कामगारांना घरे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२०) ८४३६ (११-०६-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेतील सफाई कामगारांकरीता असलेल्या आश्रय योजनेतील दादर, फोर्ट, कुलाबा, ग्रँण्ट रोड येथील घरांचे सहा प्रकल्प सुमारे दहा वर्षांपासून प्रलंबित असताना आता अंधेरी पश्चिम आणि सांताक्रूझ येथे आणखी चार ठिकाणी नवीन प्रकल्प सुरू केले जाणार असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत सफाई कामगारांच्या ४६ वसाहती असून त्यातील ३६ वसाहतींचा पुनर्विकास या प्रकल्पाच्या माध्यमातून करण्यात येणार असून सदर प्रकल्पातून २००० घरे उभी राहून त्यासाठी अंदाजे रुपये ४५० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आश्रय योजनेंतर्गत दहा वर्षापूर्वी सुरू करण्यात आलेल्या पहिल्या टप्प्यातील घरांची कामे अत्यंत धीम्या गतीने सुरू असल्यामुळे सफाई कामगारांची गैरसोय होवून त्यांच्या राहण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर सफाई कामगारांच्या सुमारे दहा वर्षापासून प्रतिक्षेत असलेली तसेच धीम्या गतीने सुरू असलेली घरांची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-१०-२०२१) :** (१) गौतम नगर (दादर) येथील पुनर्विकासाच्या कामाचे कार्यादेश सन २०१९ मध्ये पारीत करण्यात आले असून तेथील काम प्रगतीपथावर आहे.

कोचीन स्ट्रीट (फोर्ट) येथील प्रथम टप्प्यात ८६ सदनिकांचा ताबा सफाई कामगारांना देण्यात आला आहे. तसेच टप्पा-२ मधील कामाकरीता मुंबई पोर्ट ट्रस्टची वाढीव लीज प्राप्त झाल्यानंतर तेथे पुनर्विकासाचे काम सुरु करण्यात येणार आहे.

डिझाईन आणि बिल्ट टर्नकी अंतर्गत राजवाडकर स्ट्रीट (कुलाबा) येथील पुनर्विकासाकरीता कंत्राटदाराची नेमणूक करण्यात येणार असून, सदर कामाचे मसुदापत्र कार्यवाहीत आहे.

सिध्दार्थ नगर (ग्रॅण्ट रोड) ई विभाग येथील टप्पा-१ अंतर्गत पुनर्विकासाच्या कामाचे कार्यादेश सन २०१८ मध्ये पारीत करण्यात आले असून, येथील पुनर्विकासाचे काम प्रगतीपथावर आहे.

डिझाईन आणि बिल्ट टर्नकी अंतर्गत गट ६ मध्ये यारी रोड (अंधेरी), ए.बी.नायर रोड (अंधेरी पश्चिम), जुहू गल्ली (अंधेरी पश्चिम), न्यू हसनाबाद लेन (खार पश्चिम) येथील पुनर्विकासाकरीता दिनांक ०७/०९/२०२१ रोजी कंत्राटदाराची नेमणुक करण्यात आली असून, तेथील पुनर्विकासाचे काम लवकरच सुरु करण्यात येणार आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सुमारे २९,८१६ सफाई कर्मचाऱ्यांना सेवानिवासस्थाने पुरविण्याकरीता सद्य:स्थितीत असलेल्या ३४ वसाहतींचा कमाल ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन आश्रय योजनेंतर्गत सफाई कामगारांना वाढीव क्षेत्रफळाची (किमान ३०० चौ. फुट) अंदाजे १४ हजार सेवानिवासस्थाने देण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पुनर्विकास करण्याचे नियोजिले आहे.

सदर पुनर्विकासाकरीता सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी अंदाजित रुपये ४५० कोटी इतका खर्च गृहीत धरण्यात आला आहे.

(३) व (४) आश्रय योजनेंतर्गत पुनर्विकासापूर्वी तेथे राहत असलेल्या सदनिकाधारकांना स्थलांतरीत करण्याकरीता मुंबई शहर तसेच उपनगरात एकूण ११ ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपाचे संक्रमण शिबिरांचे बांधकाम करण्यात आले आहे. तसेच कोचीन स्ट्रीट येथे पुनर्विकासाचे काम पूर्ण करण्यात आले असून तेथे सफाई कामगारांना स्थलांतरीत करण्यात आले आहे. पॉवेल्स लॅण्ड (आर/दक्षिण) येथील इमारती मुख्य पर्यवेक्षक (घन कचरा व्यवस्थापन/चाळी) पश्चिम उपनगरे यांना हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत.

(५) सफाई कामगारांच्या वसाहतींचा पुनर्विकास करण्याकरीता अस्तित्वात असलेल्या सदनिकांचे निष्कासन करणे, विविध विभागांची ना-हरकत प्रमाणपत्र घेणे, विविध विभागांची मंजुरी घेणे, काही ठिकाणी लीज संपल्यामुळे ती वाढवून घेणे, सदनिकाधारकांना स्थलांतरीत करणे आवश्यक आहे. तसेच तेथेच लागून असलेल्या झोपड्या या बांधकामांमध्ये अडथळा निर्माण करत असल्यामुळे पुनर्विकास कामामध्ये बाधा येत आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील मुकुटवन वन परिक्षेत्रात गर्भवती वाघिणीची शिकार केल्याबाबत

**(२१) ८४५३ (११-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विक्रम काळे, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेशदादा पाटील, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी,**

**श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील मुकुटवन वन परिक्षेत्रातील मांगुर्ला भागात गर्भवती वाघिणीला गुहेत कोंडून जिवंत जाळून तिच्या पायाचे पंजे कापून नेल्याची घटना माहे एप्रिल, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत माहे नोव्हेंबर मध्ये उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यात गर्भवती वाघिण मृतावस्थेत सापडली असून यवतमाळ जिल्ह्यातील वाघाच्या मृत्यूची ही दुसरी घटना घडली असल्याने सदर दोन्ही घटनांमध्ये वाघांची शिकार झाल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सन २०१९-२०२० मध्ये वाईल्ड लाईफ प्रोटेक्शन संस्थेनुसार २२ वाघांचे तसेच नॅशनल टायगर कन्झरर्वेशन अॅथॉरॅटी (NTCA) च्या माहितीनुसार माहे जानेवारी ते माहे एप्रिल, २०२० या चार महिन्यांच्या कालावधीत १७ वाघ शिकार व विषप्रयोगासारख्या कारणामुळे मृत्यूमुखी पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गत काही वर्षात उक्त जिल्ह्यात वाघांची संख्या वाढली असल्याने सहज व्याघ्र दर्शन होत असल्यामुळे स्थानिक शिकाऱ्यांकडून वाघाच्या शिकारीचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास आल्यामुळे उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या दोषींवर तसेच वन अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर हत्त्या प्रकरणाचा वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाला आहे काय, अहवालात काय नमूद केले आहे व भविष्यात अशाप्रकारे वाघांची शिकार होऊ नये यासाठी कोणती भूमिका घेतली वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०१-११-२०२१) :** (१) पांढरकवडा वनविभागातील मुकुटबन वनपरिक्षेत्रातील मांगुर्ला नियतक्षेत्रात एका गर्भवती वाघीणीस जाळण्याचा प्रयत्न केल्याची घटना दिनांक २५/०४/२०२१ रोजी निदर्शनास आली आहे.

(२) उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यात दिनांक २२/११/२०२० रोजी आपआपसातील झुंजीमुळे एका गर्भवती वाघणीचा मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आली आहे.

पांढरकवडा वनविभागांतर्गत मारेगाव वनक्षेत्र खंडणी वर्तुळ वाढोणा नियतक्षेत्रात खाजगी क्षेत्र मौजा आसनगाव (उजाड) शिवारातील नाल्यामध्ये तारेचा फास लागुन दिनांक २३/०३/२०२१ रोजी एका वाघाचा मृत्य झाल्याची घटना निदर्शनास आली आहे. तसेच पांढरकवडा वनविभागातील मुकुटबन वनपरिक्षेत्रातील मांगुर्ला नियतक्षेत्रात एका गर्भवती वाघीणीस जाळण्याचा प्रयत्न केल्याची घटना दिनांक २५/०४/२०२१ रोजी निदर्शनास आली आहे.

(३) राज्यात माहे एप्रिल, २०१९ ते माहे मार्च, २०२० या कालावधीत नैसर्गिक कारणामुळे-४, अपघाती (वाहनाने व पाण्यात बुडून)-४, शिकार (ट्रपिंग, विषबाधा)-६ व विद्युतप्रवाहामुळे-२ असे एकूण १६ वाघांचा मृत्यू झाला आहे. तसे माहे जानेवारी, २०२० ते माहे एप्रिल, २०२० या कालावधीत नैसर्गिक करणामुळे-२, अपघाती (वाहनाने)-१, शिकार (विषबाधा)-१ व विद्युत प्रवाहामुळे-१ असे एकूण ५ वाघांचा मृत्यू झाला आहे.

(४) अखील भारतीय व्याघ्र प्रगणना २०१८ च्या अहवालानुसार राज्यात सन २००६ मध्ये १०३ वाघांचे अस्तित्व आढळून आले होते. त्या तुलनेत सन २०१८ मध्ये राज्यात ३१२ वाघांचे अस्तित्व आढळून आले असल्याचे नमूद आहे.

गत वर्षात उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यात प्रौढ वाघ-१ व बछडे-३ असे एकूण ४ वाघ विषबाधेने मृत झाल्याचे निदर्शनास आले आहे. प्रस्तुत प्रकरणाच्या चौकशीदरम्यान श्री.दिवाकर दत्तुजी नागेकर रा. नवेगाव (देशमुख) यांनी वाघाने मारलेल्या कालवडीवर विषप्रयोग केल्याचे तपासात कबुल केले आहे. तसेच IVRI, इज्जतनगर यांचे विश्लेषणात्मक अहवालानुसार वाघांच्या अवयवांच्या नमुन्यात Pyrethriod group मधील किटकनाशक आढळल्याचे निष्पन्न झाले आहे.

पांढरकवडा वनविभागातील मारेगाव वनक्षेत्रात दिनांक २३/०३/२०२१ रोजी वाघीणीच्या झालेल्या मृत्यू प्रकरणामध्ये ३ आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

पांढरकवडा वनविभागातील मुकुटबन वनक्षेत्रात दिनांक २५/०४/२०२१ रोजी वाघीणीच्या झालेल्या मृत्यू प्रकरणामध्ये २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच दिनांक १९/०६/२०२१ रोजी पोलीस विभागाच्या मदतीने अटक करण्यात आलेल्या ५ संशयीत आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठाण (NTCA) यांचेकडून प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर वन्यप्राण्यांच्या सुरक्षेसाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

नियमित गस्तीव्दारे वन्यप्राण्यांच्या हालचालींचे सनियंत्रण करण्यात येते. याकरीता अत्याधुनिक साधनसामुग्री जसे बिनतारी संदेश यंत्रणा, कॅमेरा ट्रॅप, जीपीएस, पीडीए यांचा वापर करण्यात येतो.

ज्या भागात वाघाचे/ बिबटयाचे संघर्षाची स्थिती निर्माण होते, त्याठिकाणी जंगलात न जाण्याबाबत सावधानतेचा इशारा दर्शक पोस्टर्स लावण्यात आलेले आहेत व आवश्यक ठिकाणी जलद प्रतिसाद चमु गठीत करण्यात आलेली आहे.

वन्यप्राण्यांसाठी जंगलात पाण्याचे स्त्रोत (पाणवठे, सिमेंट प्लग बंधारे, वनतलाव इ.) निर्माण करण्यात येतात.

ग्रामस्थांचे वनावरील अवलंबत्व कमी व्हावे व मानव वन्यजीव संघर्षाला आळा बसावा म्हणून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंतर्गत गावातील कुटूंबाना एलपीजी गॅस पुरवठा करण्यात येत आहे.

महत्वाच्या ठिकाणी तपासणी नाके, संरक्षण कुट्या उभारण्यात आलेले असून वनकर्मचारी रात्र-दिवस गस्त करतात. तसेच श्वानपथक निर्माण करुन त्याचा उपयोग करण्यात येतो.

विद्युत प्रवाहाव्दारे होणाऱ्या शिकारीच्या घटनांवर सनियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने विद्युत वितरण कंपनीच्या स्थानिक अधिकाऱ्यांना संयुक्त सभेत पाचारण करण्यात येते. तसेच शेतालगत विद्युत प्रवाह सोडल्यामुळे किंवा विद्युत प्रवाहाच्या सहाय्याने वन्य प्राण्यांची शिकार करणाऱ्यांवर वनविभाग व विद्युत विभागाचे कायदयानुसार दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल याबाबत गावागावात सभा घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्यात येते.

वन्यप्राणी शिकार अथवा वनगुन्हयासंबधी माहिती जलद प्राप्त होण्यासाठी वनविभागाची हेल्प लाईन टोल फ्री क्रमांक १९२६ कार्यान्वित करण्यात आली आहे.

प्रत्येक पाणवठ्याची वनमजुर/ वनरक्षकांमार्फत पाणवठ्यातील पाण्याची व सभोवतालच्या परिसराची नियमित तपासणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पॉस्को कंपनीमध्ये सुरु असलेल्या खंडणीखोरी व गुंडगिरीला आळा घालण्याबाबत

**(२२) ८४९६ (२१-०६-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची (एमआयडीसी) उद्योगाशी संबंधित सर्व माहिती असलेले सिंगल विंडो आणि इतर प्रणाली एका मेलव्दारे इन्स्क्रिप्ट करुन एमआयडीसीला खंडणी मागण्याचा प्रकार माहे मार्च, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विळे-भागाड (ता.माणगाव, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमध्ये पॉस्को कंपनीमध्ये सुरु असलेल्या खंडणीखोरी व गुंडगिरीला आळा घालण्याबाबत मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी दिनांक ३० एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे शासनाकडे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीने निर्माण होणाऱ्या भंगार मालाची ऑनलाईन निविदा पध्दतीने विल्हेवाट लावण्याचा निर्णय घेतल्यामुळे भंगार मालाची विल्हेवाट करण्याचे कंत्राट मिळालेल्या कंपन्यांना, वाहतूकदारांना धमकाविले जाणे, मारहाण करणे, जीवे मारण्याची धमकी देणे व खंडणीचे प्रकार घडले असून काही गाव गुंडांनी व खंडणीखोरांनी या परिसरात तलवारीसह फिरुन दहशत निर्माण केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सायबर हल्ल्याप्रकरणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पॉस्को कंपनीमध्ये सुरु असलेल्या खंडणीखोरी व गुंडगिरीला आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच किती गुंडांना अटक केली आहे व किती जणांविरुध्द गुन्हा नोंद केला आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२२-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) खंडणी वगैरे प्रकार सदर वसाहतीमध्ये निदर्शनास आलेला नाही अथवा त्याबाबत कोणताही गुन्हा दाखल नाही. तथापि, वाहनचालकांना धमकावणे तसेच वाहनांची नासधूस करुन त्यांच्याकडील रोख रक्कम काढून घेणे अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये पोलीस स्टेशन, माणगांव येथे गु.र.क्र.४६/२०२१, कोलाड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १३/२०२१, ३८/२०२१, ३९/२०२१ व ५४/२०२१ असे पाच गुन्हे दाखल झाले आहेत.
(४) नाही.
(५) पोलीस स्टेशन, माणगांव येथे गु.र.क्र. ४६/२०२१ अन्वये पंधरा ते वीस अनोळखी इसमांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.

कोलाड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १३/ २०२१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पाच इसमांना अटक करण्यात आली आहे. दिनांक ७/७/२०२१ रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

कोलाड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र ३८/२०२१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. “अ” वर्ग समरी मिळण्यासाठी अंतिम अहवाल दिनांक १५/६/२०२१ रोजी मा.न्यायालयात सादर करण्यात आला आहे.

कोलाड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र ३९/२०२१ अन्वये नऊ इसमांविरुध्द गुन्हा दाखल झाला असून त्यांना अटक करण्यात आली आहे. दिनांक २२/५/२०२१ रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

कोलाड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ५४/२०२१ अन्वये ३ अज्ञात इसमांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास चालू आहे.

विळे भागाड, ता.माणगांव औद्योगिक वसाहतीमध्ये कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये म्हणून नियमित एक अधिकारी व चार अंमलदार यांची नेमणूक केली आहे. वेळोवेळी आरसीपी प्लाटून बंदोबस्ताकरीता नेमण्यात येतो आणि गस्त चालू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील ऑगस्ट क्रांती मैदानात भारताचा स्वातंत्र्य लढा जिवंत करणारे स्मारक उभारण्याबाबत

**(२३) ८५५९ (१५-०७-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ऑगस्ट क्रांती मैदानात भारताच्या स्वातंत्र्य चळवळीची आठवण करून तसेच देणारे स्वातंत्र्य लढा जिवंत करणारे स्मारक उभारण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी स्वातंत्र्यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त ऑगस्ट क्रांती मैदानात आयोजित केलेल्या कार्यक्रमात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे व तद्नुसार ऑगस्ट क्रांती मैदानात स्वातंत्र्य लढा जिवंत करणारे स्मारक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) ऑगस्ट क्रांती मैदानात स्मारक उभारण्याच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पॅनेलवरील सल्लागाराची नेमणूक करण्यात आली असून, सदर प्रकरणी प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गौताळा, औरंगाबाद औटूम घाट अभयारण्याला नॅशनल पार्कचा दर्जा देण्याबाबत

**(२४) ८६३८ (१३-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातमाळा अजिंठा पर्वत रांगामध्ये असलेल्या गौताळा, औरंगाबाद औटूम घाट अभयारण्यात सुमारे १४८ प्रकारचे पक्षी, चिकारा, नीलगाय, बिबटे, अस्वल, जंगली मांजर, एशियन पाम सिव्हेट, लांडगे, कोल्हे इत्यादी अनेक जनावरांची लक्षणीय संख्या असल्यामुळे सदर अभयारण्याचा नॅशनल पार्क म्हणून प्राधान्याने विचार करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री महोदयांकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद आणि जळगांव जिल्ह्यात सुमारे २६,०६१ हेक्टरमध्ये पसरलेल्या गौताळा औटूम घाट भागाला सन १९८६ साली अभयारण्याचा दर्जा मिळाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गौताळा, औरंगाबाद औटूम घाट अभयारण्याचा नॅशनल पार्क करण्याबाबतच्या प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०१-११-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) गौताळा औट्रमघाट अभयारण्य म्हणुन घोषित केल्यामुळे अस्तित्वात असलेल्या जैवविविधतेस पुरेसे संरक्षण प्राप्त झाले आहे.

राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा देण्याकरीता वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ३५(३) नुसार स्थानिकांच्या सर्व अधिकारांचे क्षमण करणे बंधनकारक आहे.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ अंतर्गत वन हक्क दावे अद्याप प्रलंबित असल्याने सद्य:स्थितीत अभयारण्यास राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करणे संयुक्तिक होणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्ह्यातील प्रस्तावित चार उड्डाणपुलाचे व जुन्या बीड बायपास रोडचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२५) ८६४१ (१५-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील जुन्या बीड बायपास रोडवरील केंब्रिज शाळेजवळ (जालना रोड), देवळाई चौक, संग्रामनगर आणि एमआयटी कॉलेजजवळ असे प्रस्तावित चार उड्डाणपुलाचे काम कोरोना संसर्गामुळे गत दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच औरंगाबाद जिल्ह्यातील जुन्या बीड बायपास रोडचे रुंदीकरण, सर्व्हीस रोड (साईड पट्टया) मजबुतीकरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कामे त्वरित पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त काम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे व उपरोक्त कामांकरीता आतापर्यंत किती निधी खर्च करण्यात आला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२०-१०-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रश्नाधीन काम प्रगतीपथावर असून विहित निकषांनुसार करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## परभणी शहर पाणीपुरवठा योजनेतील गैरप्रकाराबाबत

**(२६) ८६९० (१८-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ६८५९ ला दिनांक १० मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिका येथील पाणीपुरवठा योजनेच्या कामात जागा उपलब्ध नसताना खोटी माहिती देवून प्रस्ताव तयार करणे, पाईप खरेदी घोटाळा, निविदेचे तुकडे पाडणे व इतर गैरप्रकार झाल्याने या योजनेस विलंब होवून १३० कोटी रूपयांचा भुर्दंड सहन करावा लागल्याची तक्रार परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मुख्य सचिव यांच्याकडे ई-मेलव्दारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लेखी तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य सचिव यांच्यास्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, उक्त योजनेच्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी, कंत्राटदार व इतरांची विभागीय चौकशी वा निलंबन आदी प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करुन दोषींकडून आर्थिक भुर्दंड वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-१०-२०२१) :** (१) होय.

(२), (३) व (४) युआयडीएसएसएमटी अभियान अंतर्गत परभणी महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या पाणीपुरवठा प्रकल्पातील अनियमिततेच्या अनुषंगाने एकूण ७ अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द दोषारोपपत्र बजाविण्यात आले आहे व विभागीय चौकशीची कार्यवाही चालू आहे.

---

## मौजे-बाळे (ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर) येथे नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(२७) ८७०२ (२१-०६-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.बाळाराम पाटील, श्री.किशोर दराडे : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ४०११ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यास दिनांक ४ एप्रिल, २०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनाने तत्वत: मान्यता दर्शविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात उपलब्ध असलेल्या पशुधनाच्या संख्येच्या अनुषंगाने तसेच पशुवैद्यक शाखेचा विस्तार करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले पशुवैद्यक आणि त्यानुसार सद्य:स्थितीत कार्यरत असलेली पशुवैद्यक महाविद्यालये व याचा सारासार विचार करुन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांतर्गत नविन पशुवैद्यक महाविद्यालये स्थापन करण्याबाबतच्या सुधारित बृहत आराखडा सादर करण्याची महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाकडून सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, सदर बृहत आराखड्यास मान्यता मिळाली आहे काय, सोलापूर जिल्हयात पशुवैद्यक महाविद्यालय स्थापन करण्याबाबत निर्णय घेऊन शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मौजे-बाळे (ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर) येथे नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२७-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) बृहत आराखड्याची कार्यवाही पूर्ण झालेली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी शहरात नवीन पोलीस ठाण्याची निर्मिती करण्याबाबत

**(२८) ८७२५ (१३-०७-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी (जि.परभणी) शहराची वाढलेली लोकसंख्या तसेच कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेवून परभणी शहरातील एम.आय.डी.सी. भागासाठी नवीन पोलीस ठाणे मंजूर करण्याबाबत परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मा.गृह मंत्री यांचेकडे ई-मेलद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवा मोंढा परभणी ग्रामीण व ताडकळस या तीन पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन पोलीस ठाणे उभारण्याबाबतच्या प्रस्तावात सुधारणा करुन पाठविण्यात यावा अशी सूचना तत्कालीन पोलीस महासंचालकांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, परभणी यांना केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परभणी शहरात पोलीस ठाण्याची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबतची थोडक्यात व सविस्तर माहिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२८-१०-२०२१) :** (१), (२), (३) व (४) पोलीस अधीक्षक, परभणी यांचे आस्थापनेवर पोलीस स्टेशन मोंढा, परभणी ग्रामीण, ताडकळस यांचे विभाजन करून नवीन एमआयडीसी पोलीस स्टेशन निर्माण करणेबाबतच्या प्रस्तावाचा प्रस्तावित सुधारित आकृतीबंधात समावेश असून, विभागाचा आकृतिबंध सुधारणेचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यातील नुकसानग्रस्त मासेमारी संस्थांना मदत देण्याबाबत

**(२९) ८८१८ (१५-०७-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील नदी, नाले व तलावात मच्छीमार संस्थांनी मत्स्यबीज सोडले असता तलावातील मत्स्यबीज इकार्निया या वनस्पतीमुळे मासेमारी संस्थाचे नुकसान होत असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त मासेमारी संस्थांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (२८-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

मत्स्यव्यवसाय विभागामार्फत मासेमारीकरीता ठेक्याने देण्यात येणाऱ्या तलाव/जलाशयांत इकार्निया या वनस्पतीमुळे मासेमारी संस्थांचे नुकसान झाले असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३०) ८८६७ (१५-०६-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाचा कारभार दिवसेंदिवस वाढत असून विद्यापीठातील विविध स्तरावरील १३१९ शैक्षणिक पदांना मान्यता असून यापैकी सुमारे ४५५ पदे रिक्त आहेत, तसेच मुंबई विद्यापीठाचा कारभार कंत्राटी कर्मचाऱ्यांमार्फत होत असल्याने पदवीधारक विद्यार्थ्यांचे भवितव्य कंत्राटी कारभारावर अवलंबून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांची संख्या ८८६ असून महाविद्यालयातील कामकाज सांभाळण्यापासून ते विद्यार्थ्यांची संबंधित कामे करण्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी वर्गाची गरज असताना सदरहू पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मुंबई विद्यापीठाचा वाढता कारभार लक्षात घेता सदर रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२९-१०-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.
विद्यापीठातील परीक्षाविषयक व इतर महत्वाची कामे विद्यापीठाच्या स्थायी कर्मचाऱ्यांकडून पार पाडली जात आहेत.
(२) व (३) वित्त विभागाने शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२० अन्वये कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील वित्तीय स्थिती स्थित/सुरळीत रहाण्यासाठी विविध उपाययोजना केलेल्या आहेत. त्यानुसार पदभरतीवर निर्बंध आणले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डोंबिवली (जि.ठाणे) शहरातील आयडीबीआय बँकेवर सायबर हल्ला झाल्याबाबत

**(३१) ८९५३ (२२-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) शहरातील बाजी प्रभू चौकातील आयडीबीआय बँकेतील ३०० पेक्षा जास्त खातेदारांची खाती सायबर गुन्हेगारांनी हॅक करुन लाखो रुपये लंपास केल्याची घटना माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी खातेदारांनी बँक व्यवस्थापन व पोलिसांत तक्रारी केली असता पोलीस प्रशासनाने बँकेकडून तक्रार आल्यानंतर कारवाई करु तोपर्यंत तक्रार दाखल करुन घेणार नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बँकेतील खातेदारांनी आपले पैसे परत मिळवून देण्याबाबत बँकेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सायबर गुन्हेगारांवर कारवाई करुन खातेदाराचे पैसे परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२६-१०-२०२१) :** (१) IDBI बँकेच्या बाजी प्रभु चौक, डोंबिवली पूर्व या शाखेतील फिर्यादी व इतर ३६ बँक खातेधारकांच्या खात्यातुन कोणीतरी अज्ञात इसमाने एकूण रुपये ८,३४,५००/- ए.टी.एम.द्वारे कोणाच्याही परवानगीशिवाय काढून घेवून फसवणूक केली असल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन डोंबिवली पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१०३/२०२१, कलम ४२० भा.दं.वि. सह कलम ६६(क), (ड) माहिती व तंत्रज्ञान अधिनियम, २००० अन्वये दिनांक १५/०४/२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यांच्या तपासात सद्य:स्थितीत १०५ खातेधारकांच्या खात्यातून ए.टी.एम.द्वारे रकमा काढून घेवून त्यांची फसवणूक केली आहे.

(२) हे खरे नाही.

तक्रार प्राप्त होताच फिर्यादी व इतर खातेदार हे पोलीस ठाण्यास आल्यावर त्यांच्या तक्रारींची तात्काळ दाखल घेऊन डोंबिवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला व त्याची माहिती बँकेला कळविण्यात आली.

(३) होय, हे खरे आहे.

(४) उपरोक्त प्रकरणी डोंबिवली पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी सखोल चौकशी करुन फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन डोंबिवली पोलीस ठाण्यास गुरक्र. १०३/२०२१ कलम ४२० भा.द.वि कलम ६६(क), (ड) माहिती व तंत्रज्ञान अधिनियम, २००० अन्वये अनोळखी इसमाविरुध्द गुन्हा दाखल केला असून सदर प्रकरण तपासाधिन आहे.

ग्राहकांना त्यांच्या बँक खात्यातून परस्पररित्या गायब झालेल्या रकमा परत मिळण्याच्या दृष्टीने बँकेशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तसेच आरोपी याचा शोध घेण्याकरीता सदर बँकेशी पत्रव्यवहार करुन ज्या ए.टी.एम. मधून रकमा काढून घेण्यात आल्या त्या ए.टी.एम. चे फुटेज प्राप्त करण्यात आले आहेत. सदर फुटेजची पाहणी करुन त्यातील संशयित इसमांचा शोध घेण्यात येत आहे. तसेच उपलब्ध व इतर तांत्रिक पर्यायांच्या मदतीने आरोपितांचा शोध घेण्याचे काम चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्हयाच्या वसई ते झाई जलधीक्षेत्रात मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३२) ८९५९ (१५-०७-२०२१) श्री.रविंद्र फाटक, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयाच्या वसई ते झाई जलधीक्षेत्रात पर्ससीन नेटद्‌वारे मासेमारी करण्यास बंदी असतानाही पर्ससीन बोटी क्षेत्रात घुसखोरी करुन बेकायदा मासेमारी करीत असल्याने पारंपारिक स्थानिक मच्छीमारांवर उपासमारीची वेळ आल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्ससीन बोटीवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक मच्छीमारांनी शासनाकडे केली असून याविरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा कोळीबांधवानी शासनास दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालघर जिल्ह्यातील पर्ससीन नेटद्वारे मासेमारी करणाऱ्या बोटींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (२९-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

पालघर जिल्ह्याच्या जलधी क्षेत्रात पर्ससीन मासेमारी नौका मासेमारी करताना आढळलेल्या नाहीत.

(२) हे अंशत: खरे आहे.

अनधिकृत मासेमारी करणाऱ्या नौकांवर कार्यवाही करण्याबाबत मच्छिमार प्रतिनिधी यांच्यामार्फत आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांना निवेदने सादर करण्यात येत असतात. सदर विषयाच्या अनुषंगाने अनधिकृत मासेमारीस आळा घालुन शाश्वत मासेमारी टिकून राहण्याच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

(३) शासन अधिसूचना दिनांक ०५/०२/२०१६ अन्वये पर्ससीन मासेमारीचे नियमन करण्यात आलेले असून दरवर्षी माहे सप्टेंबर ते माहे डिसेंबर या ४ महिन्याच्या कालावधीकरीता राज्याच्या जलधी क्षेत्रात उक्त अधिसूचनेमध्ये नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून परवानगी देण्यात आलेली आहे. राज्याच्या जलधी क्षेत्रात अनधिकृत पर्ससीन मासेमारी नौका निदर्शनास आल्यास अशा अनधिकृत नौकावर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ कायद्याअंतर्गत कठोर कार्यवाही करण्यात येत आहे. सन २०२०-२०२१ मध्ये एकूण ४१६ अनधिकृत पर्ससीन मासेमारी नौकांवर सागरी कायद्याअंतर्गत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर विभागात नझुल जमिनीबाबत जाहीर केलेल्या धोरणानुसार लीज नुतनीकरणात येणाऱ्या अडचणींबाबत

**(३३) ८९६३ (१५-०७-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेश कराड, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील नझुल भूखंड धारकांच्या जमिनीबाबत शासनाने दिनांक २ मार्च, २०१९ रोजी जाहीर केलेल्या शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.जमीन २४९९/प्र.क्र.१२५/८, दिनांक २३ डिसेंबर, २०१५ नुसार शर्तभंगाच्या दंड आकारणीमध्ये सुसूत्रता नसून अवाजवी दंड आकारला जात असल्याचे श्री.विलास सरंजामे, मौजे धंतोली यांच्या प्रकरणातून माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम पूर्व परवानगी न घेतल्याने आदेशाच्या दिनांकास प्रचलित दराच्या २.५ टक्के रक्कम आकारणे हे वस्तुतः योग्य नसून, शर्तभंग दंड हा बांधकाम केलेल्या दिनांकाच्या दरानुसार आकारावा ही मागणी होत आहे, तसेच बांधकाम पूर्व परवानगीसाठी अर्ज केला असता अर्ज उशिराने केल्याचे कारण देत हेतुपरस्पर व जाणीवपुर्वक चुकीची दंड आकारणी केली जात असल्याने लोकप्रतिनिधी व भूखंड धारकांनी शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिनांक २ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयात सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१४-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) श्री विलास विष्णु संरजामे यांचे दिनांक १५/०४/२०१९ चे नुतनीकरण अर्जावर दिनांक ०९/०८/२०१९ रोजी जिल्हाधिकारी यांची मंजुरी प्राप्त झाली आहे.

त्यानंतर, श्री.विलास विष्णु संरजामे यांनी दिनांक ०७/०९/२०२० रोजीच्या पत्रान्वये बांधकाम नाहरकत प्रमाणपत्राच्या अनुषंगाने आकारलेले दंड माफ करण्याच्या विनंतीस अनुसरुन, अर्जदार यांचेकडुन नुतनीकरण वेळेवर न केल्यामुळे भाडेपट्टयातील इतर अटी व शर्तीचा भंग यासाठी दंडाची आकारणी करण्याचा निर्णय दिनांक २०/०२/२०२१ रोजी घेण्यात आला असून, कोणत्याही प्रकारे बांधकाम दंडाची आकारणी करण्यात आलेली नाही.

याशिवाय अन्य प्रकरणी बांधकाम पुर्व परवानगीसाठी अर्ज केला असता अर्ज उशीराने केल्याचे कारण देत हेतुपरस्पर व जाणीवपुर्वक चुकीचा दंड आकरणी केली जाते अशी बाब नाही.

(३) नागपूर व अमरावती या विभागातील तत्कालीन मध्य प्रदेश शासन किंवा सी.पी आणि बेरार शासनाने निवासी, वाणिज्यिक आणि औद्योगिक प्रयोजनासाठी भाडेपट्याने देण्यात आलेल्या नझुल / शासकीय जमीनीसंदर्भात अस्तित्वात असलेल्या आदेशामध्ये सुसुत्रता आणणे, सदर जमीनीच्या भाडेपट्याचे नुतनीकरण करणे, शर्तभंग नियमीत करणे व अन्य बाबीच्या अनुषंगाने लोकप्रतिनीधी व संबंधिताने वेळोवळी दिलेल्या सुचनेनुसार, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार व स्थापित केलेल्या समितीच्या शिफारशी व मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार नझुल जमीनीबाबतचे धोरण दिनांक २३/१२/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले आहे. त्यामध्ये अंशत: सुधारणा करुन दिनांक ०२/०३/२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनर्जित रकमेच्या दरात सुधारणा करण्याबाबत व नझुल जमीनी फ्री होल्ड (भोगवटादार वर्ग-१) करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात येऊन त्याची अमंलबजावणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना सातवा वेतन लागू करणेबाबत

**(३४) ८९९८ (१५-०६-२०२१) श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने ७ वा वेतन आयोग लागू करुन ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असून शासनाने त्याच धर्तीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा अपवाद वगळता माहे जानेवारी, २०१९ पर्यंत सर्व शासकीय यंत्रणांना ७ वा वेतन आयोग लागू केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी, २०२० मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचारी संघाच्या मुंबईतील आझाद मैदानातील बेमुदत उपोषणादरम्यान शासनाच्या संबंधित मंत्र्यांनी, पदाधिकारी, अधिकारी व वित्त सचिव यांच्या समवेत बैठक घेवून १ महिन्याच्या आत ७ वा वेतन लागू करण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील अभियंतांच्या पदोन्नतीप्रमाणे वर्ग २ व वर्ग ३ मधील पदोन्नत्या तसेच प्रथम लिपिक, वरिष्ठ लिपिक व अन्य संवर्गातील पदोन्नत्या आजपावेतो करण्यात आलेल्या नाहीत, तसेच, कोरोना महामारीच्या काळात कार्यरत असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुरक्षा कवच म्हणून रुपये २५ लक्ष व रुपये ५० लक्षाचे विमा कवच देवून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अनुकंपा तत्वावरील जागा भरण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (२९-१०-२०२१) :** (१) दिनांक २३/०९/२०२१ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांना देखील अन्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे.

(२) लवकरात लवकर सदर विषय मार्गी लावण्यात येईल, असे सांगितले होते.

(३) सन २०२०-२१ मध्ये प्राधिकरणाने एकूण २१३ कर्मचाऱ्यांना पदोन्नत्या दिल्या आहेत. तसेच सन २०१७ ते २०१९ या कालावधीत प्राधिकरणाने एकूण १७५ पदांची अनुकंपा भरती केली आहे. कोरोनासाथ कालावधीत कोरोनामुळे मृत झालेल्या कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत प्राधिकरणामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना दिनांक २३/०९/२०२१ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१/०४/२०१७ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाने प्रथम वर्षाच्या परिक्षांचे आयोजन करताना नियमांचे उल्लंघन केल्याबाबत

**(३५) ९०४८ (१५-०६-२०२१) श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षांप्रमाणेच प्रथम वर्षाच्या परीक्षा आयोजन करताना नियमांचे पालन केले नसल्याची तक्रार प्राध्यापक संघटनेने दिनांक ९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाने महाविद्यालयाकडे सोपविलेल्या सदर परीक्षांच्या तारखा महाविद्यालय समुहाने स्वत:च्या सोयीनुसार जाहीर केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बॉम्बे युनिव्हर्सिटी ॲण्ड कॉलेज टीचर्स असोसिएशन (बुक्टू) या संघटनेने नियमानुसार अध्यापनासाठी ९० दिवसांचा कालावधी मिळाला नसल्याचा आक्षेप करुन याबाबतचे निवेदन कुलगुरुंकडे देवूनही यावर अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रथम वर्षाच्या परीक्षांच्या नियोजनाबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२७-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांची संख्या विद्यार्थ्यांची संख्या, परीक्षांची संख्या, परीक्षेचा मर्यादित कालावधी व मुंबई विद्यापीठाचे कार्यक्षेत्र (भौगोलिक परिस्थिती) लक्षात घेता, मुंबई विद्यापीठाने ८ ते १० महाविद्यालयांचे समूह तयार केले असून त्यामधील एका महाविद्यालयास मुख्य महाविद्यालय म्हणून ऑनलाईन परीक्षेच्या आयोजनाची जबाबदारी देण्यात आलेली होती. मुख्य महाविद्यालयाच्या मार्गदर्शनाव्दारे समूह महाविद्यालयातील महाविद्यालयांनी ऑनलाईन परीक्षा घेतलेल्या आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगणा (जि.नागपूर) येथील एमआयडीसी परिसरातील स्पेसवूड कारखान्याला आग लागल्याबाबत

**(३६) ९१२६ (१६-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा (जि.नागपूर) येथील एमआयडीसी परिसरातील स्पेसवूड कारखान्याला आग लागल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आगीचे नेमके कारण समजले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हिंगणा नगर पंचायत क्षेत्रात स्पेसवूड तसेच इतर अनेक कारखाने येत असून हे कारखाने चालवितांना अग्निशामक विभागाच्या नियम व अटीची पूर्तता करणे आवश्यक असतानाही बहुसंख्य कारखान्यांनी नियमाची पूर्तता केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अग्निशामक विभागाच्या नियम व अटीची पूर्तता करणे बंधनकारक करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (११-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

पोलीस पंचनामा तसेच औद्योगिक सुरक्षा संचालनालय, नागपूर व विद्युत निरीक्षक, नागपूर यांनी त्यांच्या अहवालात सदरची आग पॉवर डिस्ट्रीब्युशन बोर्ड व जंक्शन बोर्ड मध्ये इलेक्ट्रीकल शॉर्ट सर्कीटने लागली असावी, असे नमूद केले आहे.
(३) व (४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास शासनाने विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केले आहे. सन १९९९ पासून महामंडळाच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार कारखान्यांचे नकाशे मंजूर करताना अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविण्यात येतात व सदर उपाययोजनांची पुर्तता केल्याची खात्री केल्यावर सदर उद्योगास अग्निशमनाचे अंतिम ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते. महाराष्ट्र राज्यात “आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६” हा दिनांक ६ डिसेंबर, २००८ पासून लागू करण्यात आला आहे. त्यानुसार अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजना इमारतींमध्ये पुरविणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार अग्निशमन विभागामार्फत कार्यवाही करण्यात येते.

हिंगणा औद्योगिक क्षेत्रातील बहुतेक उद्योग हे सन २००८ पूर्वी प्रस्थापित झाले असल्यामुळे सदर कारखान्यात अग्निशमन यंत्रणा नाही. तथापि, जे कारखाने बांधकामात बदल/सुधारणा, उत्पादनात बदल किंवा नव्याने बांधकाम करतात त्यावेळी अग्निशमन विभागाकडून देण्यात येणाऱ्या तात्पुरत्या अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्रात अग्निशमन अधिनियमात सुचविल्याप्रमाणे कारखान्यास आवश्यक असलेल्या अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजनांची पुर्तता करण्याबाबत सुचविण्यात येते. सदर कारखान्याने तात्पुरत्या अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्रात सुचविलेल्या अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजनांची पुर्तता केल्याची खातरजमा केल्यानंतरच अंतिम ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते.

अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत असल्याबाबतचे "नमुना ब" प्रमाणपत्र दरवर्षी माहे जानेवारी व जुलै महिन्यात शासनाने नियुक्त केलेल्या अनुज्ञप्तीधारकाकडून घेवून सदरचे प्रमाणपत्र स्थानिक अग्निशमन सेवेस देणे कारखानदारास बंधनकारक करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पशुसंवर्धन अधिकाऱ्यांना कोरोनाकाळात विमा कवच देण्याबाबत

**(३७) ९१४६ (१५-०७-२०२१) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची सेवा कोरोना काळात अत्यावश्यक सेवेत समाविष्ट करण्यात येऊनही त्यांना विमा कवच न दिल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात ७०० पशुवैद्यक अधिकाऱ्यांना कोरोनाची लागण झाली असून ३० जणांना जीव गमवावा लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अधिकाऱ्यांना विमा कवच/सानुग्रह अनुदान द्यावे, लसीकरण प्राधान्याने करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य राज्यपत्रित पशुवैद्यक संघटनेने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पशुसंवर्धन अधिकाऱ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने पशुसंवर्धन अधिकाऱ्यांना विमा कवच देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२७-१०-२०२१) :** (१) व (२) पशुसंवर्धन विभागातील जिल्हा परिषद स्तरावरील ६ अधिकारी व ३१ कर्मचारी, तसेच राज्यस्तरीय कार्यालयातील ३ अधिकारी व १८ कर्मचारी असे एकूण ५८ अधिकारी/कर्मचारी कोवीड-१९ या आजाराने मृत पावल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) कोवीड-१९ च्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक काम करणाऱ्या पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्राधान्याने लसीकरण करण्याबाबत आयुक्त पशुसंवर्धन यांच्याकडून सर्व जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तसचे प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) दिनांक २९/०५/२०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर योजना ही विशिष्ट विभाग वा त्यातील कार्यरत विशिष्ट संवर्गांना अथवा अत्यावश्यक सेवांना लागू करण्यात आलेली नसून, कोरोना सार्वत्रिक साथीच्या अनुषंगाने सर्वेक्षण, शोध, मार्ग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार व मदत कार्य या कर्तव्यांवर असताना संबंधित कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास लागू आहे. त्यामुळे सरसकटपणे पशुसंवर्धन विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना विमा संरक्षण कवच, सानुग्रह अनुदान योजना लागू करता येणार नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्हयातील शेतकऱ्यांच्या बँक खात्याचे आधार प्रमाणिकरण करण्याबाबत

**(३८) ९१६४ (१०-०६-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया** : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील ३१८८ शेतकऱ्यांचे संबंधित शासकीय विभागाने आधार प्रमाणिकरण न केल्यामुळे महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ सदर शेतकऱ्यांना मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या बँक खात्यातील त्रृटींबाबत बँकांनी संबंधित शेतकऱ्यांना कळविले नसल्यामुळे शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण होऊ शकले नाही, त्यामुळे शेतकरी कर्जमुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्जमाफीसाठी पात्र असलेल्या शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण केले असूनही त्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, टाळेबंदी काळात बँकामार्फत ग्राहकांना सेवा देणे बंद असल्यामुळे या काळात शेतकऱ्यांच्या बँक खात्यातील माहितीच्या त्रुटी पूर्ण करण्यासाठी शासनाकडून बँकांना कोणत्या सूचना देण्यात आल्या आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने आधार प्रमाणिकरण करुन बँकानी शेतकऱ्यांच्या बँक खात्यातील माहितीच्या त्रुटींची करुन शेतकऱ्यांना महात्मा ज्योतीराव फुले कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२८-१०-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत दिनांक १०/०६/२०२१ अखेर हिंगोली जिल्ह्यातील एकूण ९२,९४३ शेतकऱ्यांच्या कर्जखात्याचे प्रमाणीकरण झालेले असून ३,१५३ शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण बाकी आहे.

(२) नाही.

(३) सदर योजनेंतर्गत आधार प्रमाणीकरण झालेल्या कर्जखात्यांपैकी ९१,४६६ कर्जखात्यांवर रुपये ५९४.८७ कोटीचा लाभ वर्ग करण्यात आलेला असून उर्वरीत लाभार्थ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) व (५) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत निर्गमित केलेल्या यादी मधील शेतकऱ्यांमार्फत प्रमाणीकरण करण्याची कार्यवाही करतांना काही प्रकरणांमध्ये आलेल्या तक्रारी जिल्हास्तरीय समिती/ तालुकास्तरीय समिती यांचेकडे वर्ग करण्यात आल्या. सदर जिल्हास्तरीय समिती/ तालुकास्तरीय समिती यांचेकडे प्रलंबित तक्रारींचे निराकरण करुन त्याबाबतची माहिती अपलोड करण्याच्या सुचना जिल्हास्तरीय समिती/ तालुकास्तरीय समितीद्वारे बँकांना देण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर येथील विडी उद्योगावरील कडक निर्बंध शिथील करण्याबाबत

**(३९) ९१९० (१०-०६-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ब्रेक द चेनच्या काळात उद्योगांना सुट दिली असली तरी त्यांच्यावर कडक निर्बंध लादल्यामुळे सोलापूर येथील प्रसिध्द विडी उद्योग बंद पडला असून ६० हजार विडी कामगार बेरोजगार झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना काळात वर्क फ्रॉम होमच्या धर्तीवर चालणाऱ्या उद्योगावरील कडक निर्बंध शासनाने शिथिल करून वर्क फ्रॉम होमला प्राधान्य दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विडी उद्योगावरील कडक निर्बंध शिथील करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२६-१०-२०२१) :** (१), (२) व (३) सोलापूर जिल्हयातील विडी उद्योगात एकूण १९ कारखाने असून त्यात ३२१३८ विडी कामगार कार्यरत असल्याचे कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी कळविले आहे.

कोरोना काळात शासनाने दिलेल्या निदेशानुसार वेळोवेळी महानगरपालिका सोलापूर व जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी कार्यवाही केली आहे.

विडी उद्योगाचा समावेश अत्यावश्यक सेवा वर्गात नव्हता. कच्चा माल कारखान्यातून घेऊन जाणे व पक्का माल कारखान्यात आणून देणे यात कारखान्यात गर्दी होण्याची व त्यामुळे कारोना संसर्गाची भीती असल्याने अशी परवानगी दिली नसल्याचे आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

या कालावधीत प्रत्येक कामगाराला रुपये १ हजार इतक्या अनामत रकमेचे वाटप संबंधित कारखानदारांकडून करण्यात आले आहे.

कोरोना विषाणूंचा (कोविड-१९) प्रसार रोखण्याकरीता शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सोलापूर शहरांकरीता महानगरपालिकेकडून वेळोवेळी मार्गदर्शक सूचना व आदेश तसेच कडक निर्बंध लावण्याबाबत आदेश निर्गमित केले होते. तथापि, आता निर्बंध माहे जून, २०२१ पासून शिथिल करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील गिरणी कामगारांना घराचा ताबा मिळण्याबाबत

**(४०) ९२५७ (११-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ४८३२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनामार्फत गिरणी कामगारांसाठी कोन-पनवेल (जि.रायगड) येथे मुंबई महानगरविकास प्राधिकरणामार्फत बांधण्यात आलेल्या घरांची सोडत माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान काढण्यात येऊन त्यामध्ये २४१७ गिरणी कामगार यशस्वी ठरले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर ४ वर्षांनी म्हणजे माहे डिसेंबर, २०२० मध्ये म्हाडाकडून सदनिकांची निश्चित झालेली रक्कम भरणा करण्याबाबत सोडतीत यशस्वी ठरलेल्या गिरणी कामगारांना कळविण्यात आल्यानंतर कामगारांनी बँकेकडून कर्जे घेऊन ती रक्कम म्हाडाकडे जमा करण्यात आली असताना उक्त कामगारांना एमएमआरडीए व म्हाडा यांच्यातील आपआपसातील वादामुळे अद्याप घरांचा ताबा देण्यात आला नसल्याचे दिनांक ४ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मुंबईतील बॉम्बे डाईंग व श्रीनिवास मिल या दोन गिरण्यांच्या जमिनीवर बांधलेल्या घराकरीता दिनांक १ मार्च, २०२० रोजी मा.मुख्यमंत्री यांचे हस्ते काढण्यात आलेल्या सोडतीत यशस्वी ठरलेल्या गिरणी कामगारांना

घरे ताब्यात देण्यासाठी करण्यात येणारा प्राथमिक स्वरुपाचा पत्रव्यवहार म्हाडाकडून अद्यापही करण्यात आला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गिरणी कामगारांना त्यांच्या हक्काचे घर त्वरित मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२२-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

तथापि, गिरणी कामगारांच्या प्रश्नासंदर्भात मुख्य सचिवांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०२/०२/२०२१ रोजीच्या बैठकीमधील निर्देशानुसार तत्कालीन प्रधान सचिव (गृहनिर्माण) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १७/०५/२०२१ रोजी बैठक झाली. सदर बैठकीमध्ये म्हाडा व एम.एम.आर.डी.ए. कार्यालयांनी २४१७ सदनिकांची १० दिवसात संयुक्त तपासणी करुन, तपासणी करण्यात आलेल्या सदनिकांच्या आवश्यक दुरुस्तीबाबतचा अपेक्षित खर्च काढून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत निर्देश म्हाडा व एम.एम.आर.डी.ए. यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार म्हाडा व एम.एम.आर.डी.ए. च्या अधिकाऱ्यांनी सदरहू २४१७ सदनिका असलेल्या इमारतींची संयुक्त पाहणी केलेली आहे. सद्य:स्थितीत या इमारतींचा वापर नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिकेकडून कोवीड-१९ कॉरन्टाईन संटेरसाठी होत असल्याने, या इमारतींचा ताबा एम.एम.आर.डी.ए. कडे आल्यानंतर म्हाडा व एम.एम.आर.डी.ए. कडून इमारतीच्या सुस्थितीबाबत संयुक्त पाहणी करण्यात येईल, असे म्हाडाने कळविले आहे.

(३), (४) व (५) मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते दिनांक ०१/०३/२०२० रोजी काढलेल्या सोडतीबाबत सनियंत्रण समितीच्या दिनांक ०६/०३/२०२० रोजी झालेल्या बैठकीमध्ये समितीने अहवाल सादर करण्याबाबत म्हाडास निर्देश दिले. तद्नंतर दिनांक १३/०३/२०२० रोजी राज्य शासनाकडून शासकीय निधी केवळ राष्ट्रीयकृत बँकेमध्ये ठेवणेबाबत धोरण जाहीर करण्यात आले.

त्यानुसार समन्वय यंत्रणा म्हणून बँकेची निवड करण्यासाठी निविदा प्रसिध्द करण्याबाबत प्रक्रिया सुरु करण्यात आली. परंतु, कोवीड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे दिनांक २४/०३/२०२० पासून राज्यासह संपूर्ण देशात टाळेबंदी जाहीर करण्यात आली. त्यामुळे प्रथम सुचनापत्र पाठवता आले नाही. तथापि, सद्य:स्थितीत संनियंत्रण समितीकडे सोडतीचा अहवाल सादर करण्यात आला आहे व समन्वय यंत्रणेची नियुक्ती करण्यात आली असून प्रथम सूचना पाठविण्याबाबतची कार्यवाही म्हाडाच्या स्तरावर सुरु करण्यात आलेली आहे.

---

## दापोली (जि.रत्नागिरी) येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(४१) ९३०३ (१५-०७-२०२१) श्री.रामदास कदम : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५४७६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्या इमारत बांधकामास जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मंजुरी देण्यात आली असून, कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या आणीबाणीच्या काळात मजुर उपलब्ध होऊ न शकल्याने सदर काम अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारतीचे बांधकाम माहे डिसेंबर, २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन असताना व त्याप्रमाणे संबंधित ठेकेदारास सूचना देवूनही इमारतीचे बांधकाम अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दापोली येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२७-१०-२०२१) :** (१), (२) व (३) दापोली (जिल्हा रात्नागिरी) येथील पशुवैद्यकीय चिकीत्सालयाच्या इमारत बांधकामास जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी यांनी दिनांक २९/०७/२०१५ रोजी कार्यारंभ आदेश दिले आहेत. सदर बांधकाम विहित मुदतीत पूर्ण होऊ न शकल्यामुळे ठेकेदारास मुदतवाढ देण्यात आली होती. दरम्यान कोव्हीड-१९ या रोगाच्या प्रादुर्भावामुळे काम बंद असल्याने व मजुर उपलब्ध नसल्याने काम पूर्ण करणे शक्य झाले नाही. तथापि मे, २०२१ अखेर काम पूर्ण करण्यात आले आहे. इमारत हस्तांतरणाची प्रक्रीया करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील होमगार्डच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(४२) ९३४२ (१३-०७-२०२१) डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ७२५८ ला दिनांक २ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५० हजारांहून अधिक होमगार्डच्या मानधन वाढीचा निर्णय अद्यापही प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, होमगार्डच्या विविध मागण्यांबाबत गृह विभागाला प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, होमगार्डच्या मानधनवाढीच्या प्रस्तावाला अद्यापही मान्यता न देण्याची कारणे काय, याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२०-१०-२०२१) :** (१), (२), (३) व (४) शासनाने होमगार्डचे मानधन वाढीस मान्यता देवून कर्तव्य भत्त्यात रुपये ३०० प्रतिदिन वरुन रुपये ५७० प्रतिदिन अशी वाढ केली आहे. शासनाने मानधन वाढीबाबत गृह विभाग, शासन निर्णय क्र.एचजीएस-२०१९/प्र.क्र.३८/अ/विशा-८, दिनांक ०८/०३/२०१९ निर्गमित केला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाबाबत

**(४३) ९३५६ (१३-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथे सहा महिन्यांपासून जिल्हा जात पडताळणी समितीकडे अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदर प्रलंबित प्रकरणे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२८-१०-२०२१) :** (१) होय, मार्च, २०२१ अखेर एकूण १८२८ प्रकरणे प्रलंबित होती. त्यामध्ये ३ महिन्यातील १५५०, ३ ते ६ महिन्यातील २७८ प्रकरणे प्रलंबित होती, तर ६ महिन्यावरील एकही प्रकरण प्रलंबित नव्हते.
(२) सदरील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याकरीता नागपूर समितीकडून अर्जदारांना SMS व पत्राव्दारे वारंवार त्रुटी पुर्तता करण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच विशेष मोहिम राबवून स्थानिक वृत्त पत्रामध्ये जाहिरात प्रकाशित करुन प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही केली आहे.

(३) नागपूर जिल्ह्यात कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे कडक लॉकडाऊन असल्याकारणाने समित्यांच्या कर्मचाऱ्यांची उपस्थिती १५ टक्के व नंतर ५० टक्के अशी होती. तसेच अर्जदारांना त्रुटी पुर्ततेबाबत वारंवार कळविण्यात येवून सुध्दा त्रुटी पुर्तता केली जात नसल्याने अशी प्रकरणे प्रलंबित राहतात.

---

## अकोला जिल्ह्यात सामाजिक न्याय भवन बांधण्याबाबत

**(४४) ९३९६ (१५-०७-२०२१) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यामधील स्वतंत्र सामाजिक न्याय भवन इमारतीच्या बांधकामास दिनांक ०८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास सुरुवात करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे काय, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त इमारतीचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त कामाची सद्य:स्थिती काय आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२१-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) सद्य:स्थितीत सदर इमारतीचे काम प्रगतीत आहे. कोविड-१९ या महामारीमुळे कामाची गती संथ झाली होती. परंतु सद्य:स्थितीत कामाची गती वाढवून सदर इमारतीचे सरासरी बांधकाम ६८ टक्के पूर्ण झाले असून संपूर्ण काम मार्च, २०२२ पर्यंत कोरोना नियमाचे पालन करुन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत उद्योगांना प्रोत्साहनाचा लाभ मिळण्याबाबत

**(४५) ९४७६ (०९-०६-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ४३६८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामुहिक प्रोत्साहन योजनेचे (पी.एस.आय.) आर्थिक फायदे घेतलेले परंतु पुनरुज्जीवनक्षम नसलेले ४५,५०० उद्योग वर्षानुवर्षे बंद अवस्थेत असून शासनाकडून महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या, बंद असलेल्या उपक्रमांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध होऊन, बंद उद्योग पुन्हा सुरु होण्यासाठी उक्त योजनेंतर्गत जे उद्योग घटक विहित कार्यपध्दतीत योग्य ते निकष पूर्ण करतील अशा उद्योग घटकांना विशेष अभय योजनेद्वारे सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला असून सदर योजनेस शासन निर्णय दिनांक ६ मे, २०१६ अन्वये दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंतच मुदतवाढ देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगार निर्मितीस चालना देण्यासाठी व उद्योगांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी राज्यात सामुहिक प्रोत्साहन योजना सन १९६४ पासून सुरु करण्यात आली असून या योजनेत वेळोवेळी बदल व सुधारणा करण्यात आल्या असून सामुहिक प्रोत्साहन योजनेचा समावेश राज्याचे नवीन औद्योगिक धोरण २०१९ मध्ये देखील करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उद्योग घटकांची जमिनीसकटची स्थिर मालमत्ता वापरात येण्यासाठी उद्योग घटकांना अन्य उद्योजकांकडे सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय, तसेच हस्तांतरीत करण्यास जाचक ठरत असलेला प्रसामान्य उत्पादन कालावधी कमी करुन बंद उद्योग सुरु करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सामुहिक प्रोत्साहन योजना (पी.एस.आय.) अंतर्गत अविकसित भागात गुंतवणूक होऊन उद्योगांना या योजनेतील प्रोत्साहनांचा लाभ मिळावा व रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२९-१०-२०२१) :** (१), (२), (३), (४) व (५) राज्यातील विभागनिहाय क्षेत्रिय कार्यालय अंमलबजावणी यंत्रणा असलेल्या प्रकरणात सामुहिक प्रोत्साहन योजना १९९३ ते २०१३ अंतर्गत ३३९४ उद्योग घटक जून, २०२० पर्यंत त्यांचे कार्यकालावधीत बंद अवस्थेत आहेत.

शासन निर्णय दिनांक २१ मे, २००८ नुसार घटकांचा कार्यकालावधी २५ वर्षावरुन सुक्ष्म व लघु घटकांसाठी ५ वर्षे, मध्यम व मोठ्या घटकासाठी ७ वर्षे तसेच विशाल घटकासाठी १० वर्षे असा सुधारित करण्यात आला आहे. योजनेचा लाभ घेतलेल्या घटकांचा प्रोत्साहन कालावधी समाप्त झाल्यानंतर त्यांनी वरील नमूद कालावधीकरीता कार्यरत राहणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण-२०१९ नुसार सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९, दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ रोजी लागू करण्यात आली. सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत उद्योगाची मालमत्ता हस्तांतरीत झाल्यानंतर त्या ठिकाणी नव्याने स्थापित होणाऱ्या उद्योग घटकास त्याने नव्याने केलेल्या स्थिर मालमत्ता गुंतवणूकीच्या प्रमाणात नवीन उद्योग घटकांना लागू असलेली विविध आर्थिक प्रोत्साहने जसे की, औद्योगिक प्रोत्साहन अनुदान, विद्युत शुल्क माफी, मुद्रांक शुल्क माफी, इ. मिळणेबाबत तरतूद आहे.

विना उद्योग जिल्हे, नक्षलग्रस्त जिल्हे आणि आकांक्षी जिल्हे (ॲस्पीरेशनल डिस्ट्रीक्ट - उस्मानाबाद, गडचिरोली, वाशिम व नंदुरबार) या जिल्हयातील पात्र उद्योगांना औद्योगिक प्रोत्साहन अनुदान पात्र स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या १०० टक्के प्रमाणात देय करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण-२०१९ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद उद्योग घटकांसाठी विशेष अभय योजना राबविण्यास शासन निर्णय दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेचा कार्यकाल महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण-२०१९ च्या कालावधीपर्यंत (दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत) आहे. सदर योजनेंतर्गत पात्र ठरणाऱ्या घटकांनी राज्य शासनाची सर्व मुद्दलाची रक्कम एकरकमी भरल्यास व्याज व दंडव्याज माफ करण्यात येते.

---

## महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने कोळसा धुण्याच्या कंत्राटामध्ये गैरव्यवहार केल्याबाबत

**(४६) ९७६५ (१७-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक १३५६ ला दिनांक ९ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने दोन मोठ्या वॉशरी कंपन्या व त्यांच्या चार सहयोगी कंपन्यांनाच २२ दशलक्ष टन कोळसा धुण्याचे कंत्राट चार मुख्य पात्रता निकष बदलून १० वर्षांसाठी दिल्यामुळे ४३००० कोटी रुपयांचा गैरव्यवहार माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दिनांक १३ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास राज्य शासनाने उद्योग व खनिकर्म विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चार सदस्यीय समितीने चौकशी पूर्ण करुन आपला अहवाल सादर केला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आलेले आहे व तद्नुसार उक्त समितीने चौकशी पूर्ण करुन आपला अहवाल शासनास सादर करण्यास होत असलेल्या दिरंगाईबाबत चौकशी करुन अहवाल तात्काळ सादर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२९-१०-२०२१) :** (१) प्रस्तुत प्रकरणात, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाकडून दिनांक १४/०८/२०१९ रोजी देशपातळीवर जाहीरत प्रकाशित करुन, निश्चित केलेल्या निकषांच्या आधारे कोलवॉशरीज कंत्राट देण्यात आलेले असल्याने, ही बाब खरी नाही.

(२), (३) व (४) समितीने शासनास अहवाल सादर केलेला असून, समितीच्या अहवालातील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहे. :-

राज्य शासन अंगिगृत उपक्रम या नात्याने खाणकाम व त्या निगडीत विविध उपक्रम हाती घेण्याकरीता महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर च्या उद्दिष्ट व व्याप्तीच्या कार्यकक्षेत कोल वॉशरिजचा उपक्रम समाविष्ट होऊ शकतो. सदर कामकाजासाठी कंत्राटी तंत्रज्ञ यांच्या सहाय्याने कोळसा वॉशरिजच्या कामकाजाचे समन्वय करुन महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळास रुपये ०५/- प्रति टन एवढे हाताळणी शुल्क मिळणार असल्याने आर्थिकदृष्टया सक्षमीकरण होण्याचा प्रयत्न दिसून येतो. महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्या.नागपूर यांची कोल वॉशरिजकरीता समन्वय यंत्रणा म्हणून निवड करण्याचा निर्णय परस्पर सांमजस्याने घेतलेला दिसून येतो. महाजनको कडून यापूर्वी देखील त्यांच्या स्तरावर कोल वॉशरिजची निविदा प्रक्रिया केल्याचे दिसून येते. तथापि, अशा प्रकरणी उद्भवलेले विविध न्यायालयीन प्रकरणे व चौकश्या पाहता सदर कामकाज अन्य शासकीय समन्वय यंत्रणेकडून करण्याची भूमिका महाजनकोकडून दिनांक २३/०८/२०१८ च्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेतल्याचे दिसून येते. दोन्ही महामंडळे व्यावसायिक संबंधाकरीता अशा स्वरुपाचे करार करण्याकरीता सक्षम आहेत.

या विषयासंदर्भात सन २०२० च्या अधिवेशनामध्ये उपस्थित लक्षवेधीसूचनेशी संबंधित आणि लक्षवेधी सूचनेवरील चर्चेत सहभागी मा.विधीमंडळ सदस्यांना समितीचा अहवाल दिनांक २०/१०/२०२१ च्या पत्राद्वारे सादर करण्यात आलेला आहे.

---

## राज्यातील मच्छीमार सहकारी संस्थांना तलाव ठेक्याची रक्कम भरण्यास मुदतवाढ देण्याबाबत

**(४७) ९८०९ (१५-०७-२०२१) श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना महामारीमुळे राज्यातील मच्छीमार सहकारी संस्थांना वार्षिक तलाव ठेका रक्कम भरण्याचे आदेश दिनांक ३१ मे, २०२१ पर्यंत देण्यात आल्याने कोरोना संकटामुळे सदर रक्कम भरण्यास मुदतवाढ देण्याची मागणी विदर्भ विभागीय मच्छीमार सहकारी संघाने दिनांक २२ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तलाव ठेक्याची रक्कम भरण्यास मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (२८-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

कोरोना संकटामुळे राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थांना वार्षिक तलाव ठेका रक्कम भरण्यास मुदतवाढ देण्याबाबत विदर्भ विभागीय मच्छिमार सहकारी संघाने मागणी केल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले नाही.

(२) शासनाने शासन पत्र क्र. मत्स्यवि-२०२१/प्र.क्र. ९६/पदुम-१३, दिनांक २८/०५/२०२१ अन्वये राज्यातील मासेमारीकरीता ठेक्याने देण्यात आलेल्या तलाव/जलाशयांची चालू वर्ष सन २०२१-२०२२ ची वार्षिक तलाव ठेका रक्कम भरणा करणेस व इष्टतम मत्स्य बोटुकली संचयनाची १०% आगाऊ रक्कम भरणा करणेसाठी ठेका रक्कम भरणा करण्याचा अंतिम दिनांक ३१ मे, २०२१ पासून पुढे सहा महिने (दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१) पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोकणातील प्रत्येक जिल्हयामध्ये सायबर पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबत

**(४८) ९८५७ (१७-०६-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या कोकणातील जिल्हयामध्ये सायबर पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबत कोकण पदवीधर मतदार संघाचे लोकप्रतिनिधींनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेकडे पत्राद्वारे मागणी केल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती जिल्हा पोलीस अधीक्षकांनी जिल्हा वार्षिक योजना या निधीमधून सायबर पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबत कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीमधून कोकणातील प्रत्येक जिल्हयामध्ये सायबर पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२०-१०-२०२१) :** (१) कोकण विभागातील प्रत्येक पोलीस ठाण्यात सायबर गुन्हे कक्ष निर्माण करण्याबाबत संबंधित मा.विधानपरिषद सदस्य यांनी दिनांक ०४/०३/२०२१ रोजीच्या पत्राव्दारे जिल्हा पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, यांना विनंती केली आहे.

(२) व (३) शासन अधिसूचना, गृह विभाग, क्र. पी.ओ.एस ३६१६/प्र.क्र.१२२/पोल-३ दिनांक १५/११/२०१६, द्वारे राज्यातील ४३ "सायबर लॅब/ तंत्रज्ञान युक्त गुन्हे अन्वेषण केंद्र" यांना सायबर पोलीस ठाणे"असे घोषित केले असून त्यामध्ये रत्नागिरी, पालघर, रायगड, सिंधुदूर्ग व ठाणे (ग्रामीण) येथील तंत्रज्ञान युक्त गुन्हे अन्वेषण केंद्रांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण (जि.ठाणे) येथे बेकायदेशीर बैलगाडा शर्यती आयोजित केल्याबाबत

**(४९) ९८९५ (२१-०६-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बैलगाड्यांच्या शर्यतीवर बंदी असतानाही आणि राज्यात कोरोनाचे संक्रमण रोखण्यासाठी सर्वत्र कडक निर्बंध लागू असतानाही जमावबंधीचे उल्लंघन करुन दिनांक ३० मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास कल्याण (जि.ठाणे) मधील मानपाडा पोलीस स्थानकाच्या हद्दीत बैलगाड्यांच्या शर्यती भरविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी बैलगाडा शर्यती कोणी भरविल्या आहेत, बैलगाडा शर्यती भरविणाऱ्यांवर पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बैलगाडा शर्यत भरविणाऱ्या आयोजकावर तसेच कोरोना लॉकडाऊनच्या कालावधीत याकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाच्या दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२१-१०-२०२१) :** (१) अशी बाब निदर्शनास आली आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी मानपाडा, डोंबिवली (पूर्व), पो. ठाणे येथे १६ जणांविरुध्द गुन्हा रजि.क्र.०२७८/२१ दाखल करण्यात आला आहे. तसेच ६ आरोपींना अटक करण्यात आली असून आरोपींची जामिनावर सुटका करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाडा विभागातील प्रधानमंत्री आवास योजनेत पात्र लाभार्थ्यांची यादी जाहीर करणेबाबत

**(५०) ३४४३२ (११-०८-२०१७) श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागात प्रधानमंत्री आवास योजनेत घरे मिळणार म्हणून लाखो गरजूंनी इंटरनेट कॅफेवर जाऊन अर्ज भरले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन अर्ज भरुन ११ महिने होवूनही अद्याप या योजनेतील घरांकरीता पात्र लाभार्थ्यांची यादी जाहीर झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने आढावा घेऊन उक्त योजनेकरीता पात्र लाभार्थी ठरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२२-१०-२०२१) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय दिनांक ०९/१२/२०१५ अन्वये राज्यात राबविण्यात येते. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार प्रधानमंत्री आवास योजनेच्या घटक क्र. ३ व घटक क्र. ४ अंतर्गत घरकुल मागणीबाबतचे सर्वेक्षणाची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था / अंमलबजावणी यंत्रणा यांच्यावर निश्चित केलेली आहे.

मराठवाडा विभागातील काही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ऑनलाईन पध्दतीने अर्ज प्राप्त झाले आहेत.

(२) व (३) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यातील नगरपालिका / नगरपरिषद/ नगरपंचायत यांनी सादर केलेल्या एकूण ८५,९१७ घरकुलांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (CSMC) (जानेवारी, २०२१ अखेर

पर्यंत) मंजूरी दिली आहे. यापैकी घटक क्र. ४ (BLC) खालील ७५,०२३ घरकुलांच्या प्रकल्पातील पात्र लाभार्थ्यांची यादी PMAY-U MIS Portal या संकेतस्थळावर संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी प्रसिध्द केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**

**मुंबई** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई